महाराष्ट्र शासन

# भारताच्या संविधानामध्ये अनुसूचित जमातींसाठी करण्यात आलेल्या तरतुदी

१९८४

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन
पुणे ४११ ००१

योजनेतील सहभाग

(१) डॉ. गोविंद गारे

(२) श्री. एम. बी. आफळे

या पुस्तिकेचे मराठी संकलन हे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेकडून करण्यात आले. यासाठी आदिवासी विकास विभाग, गृह विभाग, नवी दिल्ली यांच्या *"Provisions in the Constitution of India for Scheduled Tribes* या प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी पुस्तिकेचा आधार घेण्यात आला.

# भारताच्या संविधानामध्ये अनुसूचित जमातींसाठी करण्यात आलेल्या तरतुदी

वि (आर)—१९३

## ।। भारताचे संविधान ।।

### प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

## प्रस्तावना

आदिवासींची निरनिराळ्या स्तरावर होत असलेली पिळवणूक थांबवावी आणि त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी घटनाकारांनी भारतीय संविधानामध्ये अनेक बाबींचा विचारपूर्वक अंतर्भाव केलेला आहे. त्यात प्रामुख्याने अनुसूचित जमातीचे संरक्षण करणे आणि त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणांमध्ये सुधारणा करणे या दोन महत्त्वाच्या मूलभूत घटकांचा समावेश केलेला आहे.

सामाजिक व आर्थिकदृष्टच्या मागासलेला आदिवासी हा सावकारी पाशात अडकलेला आहे; त्याच्या जमिनीचे अन्यायाने हस्तांतरण झाले आहे; अध्यक्रामण होत आहे; शोषण होत आहे; ही सत्यता घटनाकारांना पटलेली होती म्हणूनच कार्यपरत्वे त्यांना जास्तीत जास्त संरक्षण देण्याच्या उद्देशाने भारतीय संविधानात अनेक अनुच्छेद आलेले आहेत. या अनुच्छेदांच्या सहाय्याने भारतातील निरनिराळ्या राज्यांना कायदे करता येऊ लागले आणि कायद्याच्या माध्यमातून राष्ट्रीय योजनांद्वारा आदिवासींची प्रगती होऊ लागली. खरे तर आदिवासींच्या विकासासाठी भारतीय संविधान हा मोलाचा ठेवा आहे.

अनुसूचित जमातीचे हितसंवर्धन होण्याचे दृष्टीने भारतीय संविधानात काही खास अटींचा समावेश झालेला आहे. परिणामी आदिवासी समाज हा हळूहळू मुख्य समाज प्रवाहामध्ये येण्याच्या मार्गावर आहे.

भारतीय संविधानामध्ये अनुसूचित जमातीस खालील बाबींवर फायदा मिळू शकतो :—

(१) राजकीय क्षेत्र :—विधी मंडळात व स्थानिक संस्थेत राखीव जागा.
(२) संरक्षण बाबी :—आर्थिक व सामाजिकदृष्टच्या पिळवणूक होणार नाही अशा तरतुदी.

(३) योजना :—शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक लाभांच्या योजना.

अशा तऱ्हेच्या मूलभूत संकल्पना लक्षात घेऊन आदिवासींच्या उन्नतीसाठी त्यांना विशेष हक्क देण्यात आले त्याचप्रमाणे त्यांच्यासाठी काही सवलतीही जाहीर करण्यात आल्या. अनुसूचित जमातीसाठी संविधानामध्ये निश्चित स्वरूपात कोणत्या बाबींचा अंतर्भाव आहे हे बऱ्याच लोकांना माहीत नाही व अशा प्रकारची विचारणाही अनेकांकडून बऱ्याच वेळा होत असते. या सर्व गोष्टी विचारात घेऊन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेने या पुस्तिकेचे काम हाती घेतले. या पुस्तिकेमध्ये अनुसूचित जमातीला अनुसरून भारतीय संविधानात आलेल्या अनुच्छेदांचे संकलन केलेले आहे.

प्रस्तुत पुस्तिकेचा वापर केवळ संदर्भ पुस्तिका म्हणूनच करण्यात यावा. यात जर काही विवाद्य मुद्दे आढळले तर भारतीय संविधानात नमूद केलेले अनुच्छेद गृहित धरण्यात यावेत, कारण तो मूळ व अधिकृत ग्रंथ आहे.

आदिवासींच्या विकासासाठी निरनिराळ्या क्षेत्रात काम करीत असलेला प्रशासकीय वर्ग, समाजसेवक, त्याचप्रमाणे आदिवासींच्या कार्याची आवड असणाऱ्या असंख्य लोकांना या पुस्तिकेचा निश्चित उपयोग होईल अशी आशा आहे.

पुणे, गोविंद गारे,

दिनांक. १ मे १९८४. संचालक,

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

महाराष्ट्र राज्य, पुणे १.



## अनुक्रमणिका


| अनुच्छेद क्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १३ | मूलभूत अधिकारांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे. | १ |
| १४ | कायद्यापुढे समानता .. | २ |
| १५ | धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई. | २ |
| १६ | सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबींमध्ये समान संधी .. | ३ |
| १९ | भाषणस्वातंत्र्य इत्यादी संबंधीच्या विवक्षित अधिकाराचे संरक्षण .. | ४ |
| २३ | माणसांचा अपव्यापार आणि वेठ यांना मनाई .. | ६ |
| २९ | अल्पसंख्यांक समाजांच्या हितासंबंधीचे संरक्षण .. | ६ |
| ४६ | अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बलेतर वर्ग यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन. | ७ |
| १६४ | मंत्र्यांसंबंधी अन्य उपबंध .. | ७ |
| २४४ | अनुसूचित क्षेत्रे व जनजाती क्षेत्रे यांचे प्रशासन .. | ७ |
| २४४ क | आसाममधील विवक्षित जनजाती क्षेत्रे समाविष्ट असलेले स्वायत्त राज्य बनवणे आणि त्याकरता स्थानिक विधान मंडळाची किंवा मंत्री परिषदेची किंवा दोन्हीची निर्मिती. | ८ |
| २७५ | विवक्षित राज्यांना संघराज्याकडून अनुदाने .. | ९ |
| ३३० | लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे. | ११ |
| ३३२ | राज्यांच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे. | १२ |
| ३३४ | राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व तीस वर्षानंतर समाप्त होणे .. | १३ |
| ३३५ | सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे हक्क. | १४ |
| ३३८ | अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती इत्यादींकरता विशेष अधिकारी. | १४ |
| ३३९ | अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जनजातींसंबंधीचे कल्याण कार्य यावर संघराज्याचे नियंत्रण. | १५ |

अनुक्रमणिका—चालू


| अनुच्छेद क्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ३४० | मागास वर्गाच्या स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी आयोगाची नियुक्ती | १५ |
| ३४२ | अनुसूचित जनजाती .. | १६ |
| ३७१ | महाराष्ट्र व गुजराथ राज्यांबाबत विशेष उपबंध .. | १७ |
| ३७१ क | नागालँड राज्याबाबत विशेष उपबंध .. | १८ |
| ३७१ ख. | आसाम राज्याबाबत विशेष उपबंध .. | २२ |
| ३७१ ग. | मणिपूर राज्याबाबत विशेष उपबंध .. | २३ |
| | पांचवी अनुसूची (भाग क) | २४ |
| | अनुसूचित क्षेत्र व अनुसूचित जनजाती यांचे प्रशासन व नियंत्रण याबाबत उपबंध | २४ |
| | जनजाती सल्लागार परिषद (भाग ख) .. | २४ |
| | अनुसूचित क्षेत्रे (भाग ग) .. | २७ |
| | अनुसूचीचे विशोधन (भाग घ) .. | २८ |
| | सहावी अनुसूची .. | २९ |
| | आसाम व मेघालय या राज्यांमधील व मिझोराम या संघःराज्य क्षेत्रामधील जनजाती-क्षेत्रांच्या प्रशासनाबाबत उपबंध. | |




## भारताचे संविधान

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक [1](सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य) घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व [2](राष्ट्राची एकता आणि एकात्मता)
यांचे आश्वासन देणारी बंधुता;
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वतःप्रत अर्पण करत आहोत.

---

1. "संविधान (बेचाळीसावे विशोधन) अधिनियम, १९७६" कलम २ द्वारे मूळ मजकुरा-ऐवजी घातले. (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).
2. "संविधान (बेचाळीसावे विशोधन) अधिनियम, १९७६" कलम २ द्वारे मूळ मजकुरा-ऐवजी घातले. (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).



वि (आर) १९३-२

# भाग ३ रा

## मूलभूत अधिकार

### सर्वसाधारण

**मूलभूत अधिकारांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे**

[1]१३. (१) या संविधानाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, या भागाच्या उपबंधाशी ते विसंगत असतील तर, अशा ते विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्य असतील.

(२) राज्य या भागाने प्रदान केलेले अधिकार हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे व्यतिक्रमण करून केलेला कोणताही कायदा त्या व्यतिक्रमणाच्या व्याप्तीपुरता शून्य असेल.

(३) या अनुच्छेदात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "विधि/कायदा" यात भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्याइतकाच प्रभावी असलेला कोणताही अध्यादेश, आदेश, उपविधी, नियम, विनियम, अधिसूचना, रूढी किंवा परिपाठ यांचा समावेश आहे ;

(ख) "अंमलात असलेले विधि/कायदे" यात भारताच्या राज्यक्षेत्रातील विधानमंडळाने किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाने या संविधानाच्या प्रारंभकाळापूर्वी पारित केलेल्या किंवा केलेल्या व पूर्वी निरसित न झालेल्या कायद्याचा समावेश आहे. मग असा कोणताही कायदा किंवा त्याचा कोणताही भाग त्यावेळी मुळीच किंवा विशिष्ट क्षेत्रामध्ये जारी नसला तरी हरकत नाही.

[2][(४) या अनुच्छेदातील कोणतीही गोष्ट अनुच्छेद ३६८ खाली संविधानात केलेल्या कोणत्याही विशोधनाला लागू असणार नाही.]

---

1. जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदामध्ये या संविधानाच्या प्रारंभासंबंधीच्या निर्देशांचा अर्थ 'संविधान (जम्मू व काश्मीरला लागू करणे) आदेश, १९५४' याच्या प्रारंभासंबंधीचे म्हणजे १४ मे, १९५४ या दिनांकासंबंधीचे निर्देश म्हणून लावण्यात येईल.
2. 'संविधान (चोविसावे विशोधन) अधिनियम, १९७१' कलम २ द्वारे घातले.

## समानतेचा अधिकार

**कायद्यापुढे समानता**

१४. राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही.

**धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई**

१५. (१) राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक :—

(क) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेले आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यात प्रवेश, अथवा

(ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सार्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर,

यांविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

[1][(४) (या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती[2] यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.]

---

1. 'संविधान (पहिले विशोधन) अधिनियम, १९५१' कलम २ द्वारे घातले.
2. जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना या अनुच्छेदाचा खंड (४) यातील अनुसूचित जनजातींचा निर्देश गाळला जाईल.



**सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबींमध्ये समान संधी**

१६. (१) राज्याच्या अखत्याराखालील सेवायोजन किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती यासंबंधींच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल.

(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या अखत्याराखालील कोणतीही नोकरी किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्या बाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

[3](३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे [4][एखादे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र यांच्या शासनाच्या अथवा त्यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या अखत्याराखालील एखाद्या प्रकारचे किंवा अनेक प्रकारचे सेवायोजन किंवा पदनियुक्ती यांच्या संबंधात अशा सेवायोजनाच्या, किंवा नियुक्तीच्या पूर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणारा] कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा धारक किंवा तिच्या शासक मंडळाचा कोणताही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्म प्रतिज्ञापित करणारी किंवा एखाद्या विशिष्ट संप्रदायाची व्यक्ती असली पाहिजे असा उपबंध करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

---

3. या अनुच्छेदाचा खंड (३) यामध्ये 'राज्य' याच्या निर्देशात जम्मू व काश्मीर राज्याच्या निर्देशाचा समावेश नाही असा त्याचा अर्थ लावला जाईल.
4. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलम २९ व अनुसूची याद्वारे "पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही राज्याच्या किंवा त्याच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या अखत्याराखाली एखाद्या प्रकारचे किंवा अनेक प्रकारचे सेवायोजन किंवा पदनियुक्ति यांच्या संबंधात, अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्या पूर्वी त्या राज्यातील निवासाविषयी कोणतीही आवश्यकता विहित करणारा" याच्याऐवजी हा मजकूर घातला.

## स्वातंत्र्याचा अधिकार

**भाषणस्वातंत्र्य, इत्यादींसंबंधीच्या विवक्षित अधिकारांचे संरक्षण.**

[1]१९. (१) सर्व नागरिकांस :—

(क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा ;

(ख) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा ;

(ग) अधिसंघ वा संघ बनवण्याचा ;

(घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा ;

(ङ) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा, [4](आणि)

[4](च) * * *

(छ) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा चालवण्याचा अधिकार असेल.

[[2](२) (खंड (१) चा उपखंड (क) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे [3](भारताची सार्वभौमता व एकात्मता) राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता यांच्या हिता-

---

1. जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, १४ मे, १९५४ पासून वीस वर्षांच्या कालावधीपर्यंत हा अनुच्छेद पुढील अपरिवर्तनांच्या अधीन असेल :—
 (एक) खंड (३) व (४) मध्ये "ज्या कायद्याद्वारे" या शब्दांच्या नंतर "राज्याची सुरक्षितता किंवा" हे शब्द घातले जातील ;
 (दोन) खंड (५) मध्ये "किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या हितसंबंधांच्या संरक्षणासाठी" या शब्दांच्या ऐवजी "किंवा राज्याच्या सुरक्षिततेच्या हितासाठी" हे शब्द घातले जातील, आणि,
 (तीन) पुढील नवीन खंडाची भर घातली जाईल, तो खंड असा :—
 "(७) खंड (२), (३), (४) व (५) यांमध्ये येणाऱ्या 'वाजवी निर्बंध' ह्या शब्दांचा अर्थ समुचित विधानमंडळाला वाजवी वाटतील असे निर्बंध असा लावला जाईल.
2. 'संविधान' (पहिले विशोधन) अधिनियम, १९५१', कलम ३ द्वारे मूळ खंड (२) ऐवजी घातले (भूतलक्षी परिणामासह).
3. 'संविधान (सोळावे विशोधन) अधिनियम, १९६३' कलम २ द्वारे घातले.
4. 'संविधान (चव्वेचाळिसावे विशोधन) अधिनियम, १९७८' कलम २ द्वारे खंड (ङ) च्या अखेरीस 'आणि' हा शब्द घातला व खंड (च) गाळला.



साठी अथवा न्यायालयाचा अवमान, अब्रुनुकसानी किंवा अपराधास चिथावणी यांच्या संबंधात जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.].

(३) उक्त खंडाचा उपखंड (ख) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे [3](भारताची सार्वभौमता व एकात्मता किंवा) सार्वजनिक सुव्यवस्था यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४) उक्त खंडाचा उपखंड (ग) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे [3](भारताची सार्वभौमता व एकात्मता किंवा) सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) उक्त खंडामधील [5](उपखंड (घ) व (ङ) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडांनी प्रदान केलेल्या अधिकारापैकी कोणत्याही अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या हितसंबंधांच्या संरक्षणासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(६) उक्त खंडाचा उपखंड (छ) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा

---

3. 'संविधान (सोळावे विशोधन) अधिनियम, १९६३' कलम २ द्वारे घातले.
5. कित्ता-कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही, आणि विशेषतः [1](उक्त उपखंडातील कोणत्याही गोष्टीमुळे, जो कायदा—

(एक) कोणताही पेशा आचरण्याकरता अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा चालवण्याकरता आवश्यक असलेल्या पेशाविषयक किंवा तंत्रविषयक अर्हता, अथवा

(दोन) नागरिकांना पूर्णतः किंवा अंशतः वगळून अथवा अन्यथा राज्याने अथवा राज्याचे स्वामित्व किंवा नियंत्रण असलेल्या निगमाने कोणताही व्यापार, धंदा, उद्योग किंवा सेवा चालवणे,

यांच्याशी जेथवर संबद्ध असेल तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही).

### शोषणाविरुद्ध अधिकार

**माणसांचा अपव्यापार आणि वेठ यांना मनाई**

२३. (१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठ मना करण्यात आली आहे आणि या उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) सार्वजनिक प्रयोजनांकरता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवाबंधन लादताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

### सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार

**अल्पसंख्यांक समाजाच्या हितसंबंधाचे संरक्षण**

२९. (१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल.

(२) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ

---

1. 'संविधान (पहिले विशोधन) अधिनियम, १९५१' कलम ३ द्वारे विवक्षित मूळ शब्दांऐवजी घातले.



धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यांपैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बलतर वर्ग यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन.**

४६. राज्य हे दुर्बलतर जनवर्ग, आणि विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे संरक्षण करील.

**मंत्र्यांसंबंधी अन्य उपबंध**

[1]१६४. (१) मुख्यमंत्री राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इतर मंत्री राज्यपालाकडून मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यावरून नियुक्त केले जातील, आणि राज्यपालाची मर्जी असेपर्यंत मंत्री अधिकारपदे धारण करतील.

परंतु बिहार, मध्यप्रदेश व ओरिसा या राज्यांमध्ये एका मंत्र्याकडे जनजातींच्या कल्याणकार्याचा प्रभार असेल व त्याशिवाय त्याच्याकडे अनुसूचित जातींचे व मागास वर्गाचे कल्याणकार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रभार असेल.

### भाग १० वा[1]

### अनुसूचित क्षेत्रे व जनजाति क्षेत्रे

**अनुसूचित क्षेत्रे व जनजाति क्षेत्रे यांचे प्रशासन**

२४४. (१) पाचव्या अनुसूचीचे उपबंध [2](आसाम व मेघालय ही राज्ये) वगळता [4]...... अन्य कोणत्याही राज्यातील अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जनजाती यांचे प्रशासन व नियंत्रण यांच्या बाबतीत लागू असतील.

---

1. हा अनुच्छेद जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.
1. जम्मू व काश्मीर राज्यास लागू नाही.
2. "ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१" (१९७१ चा ८१)–कलम ७१ द्वारे 'आसाम राज्य' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून.)
3. "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६" कलम २९ व अनुसूची याद्वारे 'पहिल्या अनुसूचीचा भाग क किंवा भाग ख यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या" हा मजकूर गाळला.
4. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम १९५६ "कलम १९ व अनुसूचि या द्वारे" पहिल्या अनुसूचीचा भाग क किंवा भाग ख यामध्ये विनिर्दिष्ट केलेला" हा मजकूर गाळला.

(२) सहाव्या अनुसूचीचे उपबंध [2](आसाम व मेघालय ही राज्ये आणि मिझोरम हे संघ राज्यक्षेत्र) यातील जनजाती-क्षेत्रांच्या प्रशासनाच्या-बाबतीत लागू असतील.

**[5](आसाममधील विवक्षित जनजाति क्षेत्रे समाविष्ट असलेले स्वायत्त राज्य बनविणे आणि त्याकरता स्थानिक विधानमंडळाची किंवा मंत्रिपरिषदेची किंवा दोन्हींची निर्मिती)**

[5]२४४. क. (१) या संविधानात काहीही असले तरी, संसदेला कायद्याद्वारे आसाम राज्यात, सहाव्या अनुसूचीतील २० व्या परिच्छेदासोबत जोडलेल्या तक्त्यातील [3](भाग १ ला) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही जनजाती क्षेत्रे (संपूर्णतः किंवा अंशतः) समाविष्ट असलेले स्वायत्त राज्य बनवता येईल आणि त्याच्याकरता—

(क) त्या स्वायत्त राज्याचे विधानमंडळ म्हणून कार्य करणारा एक निकाय–मग तो निवडून द्यावयाचा असो किंवा अंशतः नाम-निर्देशित करावयाचा व अंशतः निवडून द्यावयाचा असो किंवा

(ख) एक मंत्रिपरिषद,

किंवा दोन्ही निर्मिता येतील व प्रत्येक बाबतीत, कायद्या-मध्ये विनिर्दिष्ट केली जाईल अशी त्यांची घटना, शक्ती व कार्ये राहतील.

(२) खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही कायद्याद्वारे, विशेषतः—

(क) राज्य सूचीत किंवा समवर्ती सूचीत नमूद केलेल्यापैकी कोणत्या बाबींसंबंधी स्वायत्त राज्याच्या विधानमंडळास त्याच्या संपूर्ण किंवा कोणत्याही भागाकरता कायदे करण्याची शक्ती असेल ते विनिर्दिष्ट करता येईल. मग ती आसाम राज्याच्या विधान-मंडळास वर्जून असो किंवा अन्यथा असो.

---

3. कित्ता–कलम ७१ द्वारे 'भाग क' या शब्दाऐवजी घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हांपासून)

5. 'संविधान (बाविसावे विशोधन) अधिनियम, १९६९ कलम २ द्वारे घातले.



(ख) स्वायत्त राज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत कोणत्या बाबी येतील ते निश्चित करता येईल,

(ग) आसाम राज्याने बसवलेल्या कोणत्याही कराचे उत्पन्न स्वायत्त राज्याशी संबंधनीय असेल तेथवर ते त्या स्वायत्त राज्यास नेमून दिले जावे असे उपबंधित करता येईल,

(घ) या संविधानाच्या कोणत्याही अनुच्छेदातील राज्यासंबंधीच्या कोणत्याही निर्देशामध्ये, त्या स्वायत्त राज्यासंबंधीच्या निर्देशाचा समावेश आहे असा त्याचा अर्थ लावला जावा असे उपबंधित करता येईल, आणि

(ङ) जरूर वाटतील असे पूरक, आनुषंगिक व परिणामी उपबंध करता येतील.

(३) पूर्वोक्त अशा कोणत्याही कायद्याचे विशोधन हे खंड (२) च्या उपखंड (क) किंवा उपखंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणत्याही बाबींशी संबंधित असेल तेथवर ते संसदेच्या प्रत्येक सभागृहात उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश इतक्या सदस्यांनी पारित केल्याशिवाय परिणामक होणार नाही.

(४) या अनुच्छेदात निर्देशिलेल्या अशा कोणत्याही कायद्यात, या संविधानाचे जो विशोधन करतो किंवा ज्यामुळे परिणामी या संविधानाचे विशोधन होते असा कोणताही उपबंध अंतर्भूत असला तरीही, तो कायदा अनुच्छेद ३६८ च्या प्रयोजनांकरता या संविधानाचे विशोधन असल्याचे मानले जाणार नाही).

**विवक्षित राज्यांना संघराज्याकडून अनुदाने**

२७५. (१) संसद कायद्याद्वारे उपबंधित करील अशा रकमा, ज्यांना सहाय्याची गरज आहे असे संसद ठरवील अशा राज्यांच्या महसुलास सहाय्यक अनुदाने म्हणून दरवर्षी भारताच्या एकत्रित निधीवर प्रभारित केल्या जातील, आणि वेगवेगळ्या राज्यांकरिता वेगवेगळ्या रकमा निश्चित करता येतील,

परंतु, एखाद्या राज्यातील अनुसूचित जनजातींच्या कल्याण वृद्धीसाठी किंवा त्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रांची प्रशासन पातळी त्या राज्याच्या उर्वरित क्षेत्रांच्या प्रशासन-पातळीइतकी उंचावण्यासाठी ते राज्य भारत सरकारच्या

मान्यतेने हाती घेईल अशा विकास योजनांचा खर्च भागवणे राज्याला शक्य व्हावे यासाठी, आवश्यक असतील अशा भांडवली व आवर्ती रकमा त्या राज्याच्या महसुलास सहायक अनुदानें म्हणून भारताच्या एकत्रित निधीतून दिल्या जातील.

परंतु आणखी असे की, आसाम राज्याच्या महसुलास सहायक अनुदाने म्हणून :—

(क) सहाव्या अनुसूचीच्या २० व्या परिच्छेदासोबत जोडलेल्या तक्त्याचा [1](भाग १ ला) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जनजाती क्षेत्रांच्या प्रशासनाबाबत या संविधानाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वीच्या दोन वर्षातील महसुलाहून अधिक झालेल्या खर्चाच्या सरासरीएवढ्या, आणि

(ख) त्या राज्यातील उक्त क्षेत्रांची प्रशासन पातळी उर्वरित क्षेत्रांच्या प्रशासन पातळीइतकी उंचावण्याच्या प्रयोजनार्थ ते राज्य भारत सरकारच्या मान्यतेने हाती घेईल अशा विकास योजनांच्या खर्चाएवढ्या,

भांडवली व आवर्ती रकमा भारताच्या एकत्रित निधीतून दिल्या जातील.

[2][(१-क) अनुच्छेद २४४ क खाली स्वायत्त राज्य बनेल तेव्हा व तेव्हापासून :—

(एक) खंड (१) च्या दुसऱ्या परंतुकातील खंड (क) खाली द्यावयाच्या कोणत्याही रकमा, जर स्वायत्त राज्य त्या खंडात निर्दिष्ट केलेली सर्व जनजाती-क्षेत्रे मिळून झालेले असेल तर, स्वायत्त राज्यास दिल्या जातील, आणि स्वायत्त राज्य त्या जनजाति-क्षेत्रांपैकी काहींचेच मिळून झाले असेल तर, राष्ट्रपती आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील त्यानुसार आसाम राज्य व स्वायत्त राज्य यांच्यामध्ये संविभाजित केल्या जातील ;

(दोन) स्वायत्त राज्याची प्रशासन-पातळी उर्वरित आसाम राज्याच्या प्रशासन-पातळीइतकी उंचावण्यासाठी स्वायत्त राज्य भारत

1. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८१)—कलम ८१ द्वारे "भाग क" याऐवजी घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).
2. 'संविधान (बाविसावे विशोधन) अधिनियम, १९६९' कलम ३ द्वारे घातले.



सरकारच्या मान्यतेने हाती घेईल अशा विकास योजनांच्या खर्चाएवढ्या भांडवली व आवर्ती रकमा त्या राज्याच्या महसुलास सहायक अनुदानें म्हणून भारताच्या एकत्रित निधीतून दिल्या जातील.]

(२) संसदेकडून खंड (१) खाली उपबंध करण्यात येईपर्यंत, त्या खंडाखाली संसदेला प्रदान केलेल्या शक्ती राष्ट्रपतीला आदेशाद्वारे वापरता येण्यासारख्या असतील आणि राष्ट्रपतीने या खंडाखाली केलेला कोणताही आदेश संसदेने याप्रमाणे केलेल्या कोणत्याही उपबंधाच्या अधीनतेने परिणामक होईल ;

परंतु, वित्त आयोग घटित झाल्यानंतर, वित्त आयोगाच्या शिफारशींचा विचार केल्याखेरीज, राष्ट्रपती या खंडाखाली कोणताही आदेश करणार नाही.

# भाग १६ वा

## विवक्षित वर्गासंबंधी विशेष उपबंध

**लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवणे.**

[1]३३०. (१) लोकसभेत :—

(क) अनुसूचित जाती,

(ख) [2][(एक) आसामच्या जनजाति क्षेत्रांमधील,
(दोन) नागालँडमधील,
(तीन) मेघालयामधील,
(चार) अरुणाचल प्रदेशामधील, आणि
(पाच) मिझोराममधील,

जनजाती खेरीजकरून अनुसूचित जनजाती, आणि]

(ग) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यामधील अनुसूचित जनजाती, यांच्याकरता जागा राखून ठेवल्या जातील.

1. जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदामधील अनुसूचित जनजाती-संबंधीचे निर्देश गाळले जातील.
2. 'संविधान (एकतिसावे विशोधन) अधिनियम, १९७३'—कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) ज्याच्या संबंधात खंड (१) खाली अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवल्या आहेत असे, प्रकरणपरत्वे, कोणतेही राज्य [4] (किंवा संघ राज्य क्षेत्र) यामधील अनुसूचित जातींच्या अथवा असे राज्य [4](किंवा संघ राज्य क्षेत्र) अथवा अशा राज्याचा [4](किंवा संघ राज्य क्षेत्राचा) भाग यामधील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या [4](किंवा संघ राज्य क्षेत्राच्या) एकूण लोकसंख्येशी जितके प्रमाण असेल तितकेच जवळजवळ, त्या राज्यात [4](किंवा संघ राज्य क्षेत्रात) अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे लोकसभेत त्या राज्यास [4](किंवा संघ राज्य क्षेत्रास) नेमून दिलेल्या जागांच्या एकूण संख्येशी प्रमाण असेल.

[3][(३) खंड (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आसामच्या स्वायत्त जिल्ह्यामधील जनजातीसाठी लोकसभेत राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे त्या राज्याला नेमून दिलेल्या जागांच्या एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे कमीत कमी उक्त स्वायत्त जिल्ह्यांमधील जनजातींच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल :.

[5][स्पष्टीकरण :—या अनुच्छेदात व अनुच्छेद ३३२ मध्ये 'लोकसंख्या' या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या जनगणनेची संबंध आकडेवारी प्रकाशित झालेली आहे अशा लगतपूर्वी जनगणनेमध्ये अजमावलेली लोकसंख्या असा आहे,

परंतु, या स्पष्टीकरणातील 'ज्या जनगणनेची संबंध आकडेवारी प्रकाशित झालेली आहे अशी लगतपूर्व जनगणना' या उल्लेखाचा अर्थ, सन २००० नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेची संबंध आकडेवारी प्रकाशित होईपर्यंत १९७१ सालच्या जनगणनेचा उल्लेख म्हणून लावला जाईल.]

**राज्यांच्या विधान सभांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवणे**

[1]३३२. (१) अनुसूचित जाती व [2][आसामच्या जनजाती क्षेत्रांमधील, नागालँडमधील व मेघालयामधील अनुसूचित जनजाती खेरीजकरून

3. कित्ता कलम ३ द्वारे घातले.
4. "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६ कलम २९ व अनुसूची याद्वारे घातले.
5. "संविधान (बेचाळिसावे विशोधन) अधिनियम, १९७६ कलम ४७ द्वारे घातले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)
1. हा अनुच्छेद जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.
2. 'संविधान (एकतिसावे विशोधन) अधिनियम, १९७३' कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.



अनुसूचित जनजाती यांच्याकरता [3]......प्रत्येक राज्याच्या विधानसभेत जागा राखून ठेवल्या जातील.

(२) आसाम राज्याच्या विधानसभेत स्वायत्त जिल्ह्यांसाठी देखील जागा राखून ठेवल्या जातील.

(३) ज्याच्या संबंधात खंड (१) खाली अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवल्या आहेत अशा, प्रकरणपरत्वे, कोणत्याही राज्यातील अनुसूचित जातींच्या अथवा, अशा राज्यातील किंवा राज्याच्या भागातील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तितकेच जवळजवळ, त्या राज्याच्या विधानसभेत अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे विधानसभेतील जागांच्या एकूण संख्येशी प्रमाण असेल.

(४) आसाम राज्याच्या विधानसभेत एखाद्या स्वायत्त जिल्ह्याकरता राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे त्या विधान सभेतील जागांच्या एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे कमीत कमी त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल.

(५) [5]......आसामच्या कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याकरता राखून ठेवलेल्या जागांच्या मतदारसंघात त्या जिल्ह्याबाहेरील कोणतेही क्षेत्र समाविष्ट असणार नाही.

(६) आसाम राज्याच्या कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजातीचा घटक नसलेली अशी कोणतीही व्यक्ती त्या जिल्ह्यातील [5]..... कोणत्याही मतदार संघातून होणाऱ्या त्या राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीस पात्र असणार नाही.

**राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व तीस वर्षानंतर समाप्त होणे.**

[8]३३४. या भागाच्या पूर्वगामी उपबंधांमध्ये काहीही असले तरी—

(क) लोकसभेत व राज्यांच्या विधानसभात अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवणे, आणि

3. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलम २९ व अनुसूची याद्वारे "पहिल्या अनुसूचीचा भाग क किंवा भाग ख यात उल्लेखिलेल्या" हे शब्द गाळले.
5. "ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१" कलम ७१ द्वारे "शिलाँग छावणी व नगरपालिका समाविष्ट असलेल्या मतदारसंघांची बाब खेरीज करून" हे शब्द गाळले.
8. जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदामधील "राज्य" किंवा "राज्ये" यासंबंधीच्या निर्देशांमध्ये जम्मू व काश्मीर राज्यासंबंधीचे निर्देश समाविष्ट नाहीत असा त्यांचा अर्थ लावला जाईल.

(ख) लोकसभेत व राज्यांच्या विधानसभांत आंग्लभारतीय समाजाला नामनिर्देशनाद्वारे प्रतिनिधित्व असणे,

याविषयीचे या संविधानाचे उपबंध या संविधानाच्या प्रारंभापासून [7](तीस वर्षाचा) कालावधी संपताच परिणामक असण्याचे समाप्त होईल.

परंतु, या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे लोकसभेतील किंवा राज्याच्या विधानसभेतील कोणत्याही प्रतिनिधित्वावर, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या लोकसभेचे किंवा, प्रकरणपरत्वे, विधानसभेचे विसर्जन होईपर्यंत परिणाम होणार नाही.

**सेवा व पदे यांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे हक्क**

[1]३३५. संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करताना अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांमधील व्यक्तींचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रीतीने विचारात घेतले जातील.

**अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती इ. करता विशेष अधिकारी**

३३८. (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता एक विशेष अधिकारी असेल व तो राष्ट्रपतीने नियुक्त करावयाचा असेल.

(२) अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्यासाठी या संविधानाखाली उपबंधित केलेल्या संरक्षक तरतुदींसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण करणे व राष्ट्रपती निर्देशित करील अशा कालांतरागणिक त्या संरक्षक तरतुदींच्या कार्यवाहीबाबत राष्ट्रपतीस अहवाल देणे हे विशेष अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल, आणि राष्ट्रपती असे सर्व अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेववील.

(३) या अनुच्छेदात अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यासंबंधीच्या निर्देशांमध्ये अनुच्छेद ३४० च्या खंड (१) खाली नियुक्त केलेल्या आयोगाचा अहवाल मिळाल्यावर राष्ट्रपती विनिर्दिष्ट करील अशा अन्य

7. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलम ५ द्वारे "वीस वर्षे" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

1. जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदामधील यासंबंधीच्या निर्देशांमध्ये जम्मू व काश्मीर राज्यासंबंधीचे निर्देशांचा समाविष्ट नाहीत असा त्यांचा अर्थ लावला जाईल.



मागासवर्गीयांच्या व आंग्ल-भारतीय समाजाच्याही संबंधीचे निर्देश समाविष्ट आहेत असा त्यांचा अर्थ लावला जाईल.

**अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जनजातीसंबंधीचे कल्याण कार्य यांवर संघराज्याचे नियंत्रण,**

[2]३३९. (१) राष्ट्रपतीला आदेशाद्वारे, [4]...... राज्यांमधील अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जनजातीसंबंधीचे कल्याणकार्य यावर अहवाल देण्याकरता एक आयोग कोणत्याही वेळी नियुक्त करता येईल; मात्र या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षे संपताच तो नियुक्त करावाच लागेल.

त्या आदेशाद्वारे आयोगाची घडण, शक्ती व कार्यपद्धती निश्चित करता येईल आणि त्यात राष्ट्रपतीस आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे आनुषंगिक किंवा सहाय्यभूत उपबंध अंतर्भूत असू शकतील.

(२) [2](एखाद्या राज्याला) निर्देश देऊन, त्यामध्ये त्या राज्यातील जनजातींच्या कल्याणाकरता ज्या योजना अत्यावश्यक असल्याचे विनिर्दिष्ट केलेले असेल त्या योजनांचा मसुदा तयार करणे व अंमलबजावणी करणे यासंबंधी त्याद्वारे निर्देशन करणे हेसुद्धा संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येईल.

**मागास वर्गाच्या स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी आयोगाची नियुक्ती**

३४०. (१) भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या स्थितीचे व त्यांना ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्यांचे अन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणत्या उपाययोजना कराव्या यासंबंधी व त्या प्रयोजनाकरता संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणती अनुदाने द्यावीत व कोणत्या शर्तीच्या अधीनतेने अशी अनुदाने द्यावी

2. हा अनुच्छेद जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.

4. कित्ता-कलम २९ व अनुसूची यांद्वारे "पहिल्या अनुसूचीचा भाग क किंवा ख या उल्लेखिलेल्या" हा मजकूर गाळला.

2. "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६" कलम २९ व अनुसूची याद्वारे अशा कोणत्याही राज्याला" याऐवजी हा मजकूर घातला.

त्यासंबंधी शिफारशी करणे याकरता राष्ट्रपतीला त्यास योग्य वाटतील अशा व्यक्ती मिळून बनलेला आयोग आदेशाद्वारे नियुक्त करता येईल, आणि असा आयोग नियुक्त करणाऱ्या आदेशाद्वारे, आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल.

(२) याप्रमाणे नियुक्त केलेला आयोग त्याच्याकडे निर्देशिलेल्या बाबींचे अन्वेषण करील, आणि त्यास आढळून येईल अशी वस्तुस्थिती मांडणारा व त्याला उचित वाटतील अशा शिफारशी करणारा अहवाल राष्ट्रपतीस सादर करील.

(३) राष्ट्रपती याप्रमाणे सादर केलेल्या अहवालाची प्रत, त्यावर केलेल्या कारवाईचे स्पष्टीकरण करणाऱ्या निवेदनासहित, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील.

**अनुसूचित जनजाती**

[1]३४२. (१) राष्ट्रपतीला [2][कोणत्याही राज्याच्या [3](किंवा संघ-राज्यक्षेत्राच्या) बाबतीत आणि ते [4]...... राज्य असेल तर त्याच्या राज्यपालाचा [5]...... विचार घेतल्यानंतर,] जाहीर [6]अधिसूचनेद्वारे त्या राज्यात [3](किंवा प्रकरणपरत्वे, संघ राज्यक्षेत्रात) या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जनजाती म्हणून मानल्या जातील त्या जनजाती किंवा जनजाती-समाज अथवा जनजाती किंवा जनजाती-समाज यांचे भाग किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करता येतील.

---

1. हा अनुच्छेद जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.
2. "संविधान (पहिले विशोधन) अधिनियम, १९५१" - कलम ११ द्वारे "राज्याचा राज्यपाल किंवा राजप्रमुख याचा विचार घेतल्यानंतर" याऐवजी हा मजकूर घातला.
3. "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६" - कलम २९ व अनुसूची याद्वारे घातले.
4. कित्ता-कलम २९ व अनुसूची याद्वारे "पहिल्या अनुसूचीचा भाग क किंवा भाग ख यात उल्लेखिलेले" हा मजकूर गाळला.
5. कित्ता कलम २९ व अनुसूची याद्वारे "किंवा" हा शब्द व "राजप्रमुख" याचा उल्लेख गाळला.
6. विधी मंत्रालय अधिसूचना क्रमांक सीओ २२, दिनांक ६ सप्टेंबर १९५०, भारताचे राजपत्र, असाधारण, भाग २-उपविभाग ३, पृष्ठ ५९७ यासह प्रकाशित झालेला वेळोवेळी विशोधित झालेला असा "संविधान (अनुसूचित जनजाती) आदेश, १९५०" विधि मंत्रालय अधिसूचना क्रमांक सी. ओ. ३३, दिनांक २० सप्टेंबर, १९५१ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग-२-उपविभाग ३, पृष्ठ ११९८ छ यासह प्रकाशित झालेल्या "संविधान (अनुसूचित जनजाती) (संघ राज्यक्षेत्रे) आदेश, १९५१," विधि मंत्रालय अधिसूचना



(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज अथवा कोणतीही जनजाती किंवा जनजाती-समज यांचा भाग किंवा त्यांतील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जनजातींच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा तीमधून वगळता येईल, पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा फरक केला जाणार नाही.

**महाराष्ट्र व गुजराथ या राज्यांबाबत विशेष उपबंध**

[2]([3]३७१. [4](१) ........

(२) या संविधानात काहीही असले तरी, [5](महाराष्ट्र किंवा गुजराथ ह्या राज्याबाबत) आदेश करून त्याद्वारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टींसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपवण्याचा उपबंध करता येईल :—

(क) विदर्भ, मराठवाडा [6](व उर्वरित महाराष्ट्र किंवा, प्रकरणपरत्वे) सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजराथ यांच्यासाठी अलग अलग विकास मंडळे स्थापन करून, त्यापैकी प्रत्येक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल अशी तजवीज करणे ;

---

क्रमांक सी. ओ. ५८ दिनांक १९५९, भारताचे राजपत्र, असाधारण भाग-२-उपविभाग ३ (१) पृष्ठ १५१ यासह प्रकाशित झालेला "संविधान (अंदमान आणि निकोबार बेटे) अनुसूचित जनजाती आदेश, १९५९ विधि मंत्रालय अधिसूचना क्रमांक सी. ओ. ६५, दिनांक ३० जून, १९६२, भारताचे राजपत्र, असाधारण भाग-२-उपविभाग ३ (१) पृष्ठ १८९ यासह प्रकाशित झालेला "संविधान (दादरा व नगर हवेली) अनुसूचित जनजाती आदेश, १९६२ विधि मंत्रालय अधिसूचना क्रमांक सी. ओ. ७८, दिनांक २४ जून, १९६७ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग २ उपविभाग ३ (१), पृष्ठ ३११ यासह प्रकाशित झालेला "संविधान (अनुसूचित जनजाती) (उत्तर प्रदेश) आदेश, १९६७" विधी मंत्रालय अधिसूचना क्रमांक सी. ओ. ८२, दिनांक १२ जानेवारी १९६८, भारताचे राजपत्र, असाधारण भाग-२-उपविभाग ३ (१), पृष्ठ ८ यासह प्रकाशित झालेला "संविधान (गोवा, दमण व दीव) अनुसूचित जनजाती आदेश, १९६८" पहा

2. "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६, कलम २२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
3. हा अनुच्छेद जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.
4. "संविधान (बत्तिसावे विशोधन) अधिनियम, १९७३-कलम २ द्वारे गाळले (१ जुलै, १९७४ रोजी व तेव्हापासून).
5. "मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६०" (१९६० चा ११) कलम ८५ द्वारे "मुंबई राज्याबाबत" याऐवजी हा मजकूर घातला (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून)
6. कित्ता-कलम ८५ द्वारे "उर्वरित महाराष्ट्र" याऐवजी हा मजकूर घातला (१ मे, १९६० रोजी व तेव्हांपासून).

(ख) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रावरील विकासखर्चासाठी पैशांची समन्यायानुसार वाटणी करणे ;

(ग) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रांबाबत तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सोयी व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायानुसार व्यवस्था करणे.

**नागालँड राज्याबाबत विशेष उपबंध**

7 ([3]३७१ क. (१) या संविधानात काहीही असले तरी :—

(क) (एक) नागांचे धार्मिक किंवा सामाजिक आचार,

(दोन) नागांचा रुढीप्राप्त कायदा व प्रक्रिया,

(तीन) नागांच्या रुढीप्राप्त कायद्यानुसार निर्णय देणे हे ज्यात अनुस्यूत आहे असे दिवाणी व फौजदारी न्यायतान,

(चार) जमीन व तिच्यातील साधनसंपत्ती त्यांचे स्वामित्व व हस्तांतरण,

याबाबतचा संसदेचा कोणताही अधिनियम, नागालँडच्या विधानसभेने ठरावाद्वारे तसे ठरवल्याशिवाय नागालँड राज्याला लागू होणार नाही.

(ख) नागालँड राज्याच्या निर्मितीच्या निकटपूर्वी नागा हिल्स-ट्यूएनसांग क्षेत्रात उद्भवणारे अंतर्गत दंगेधोपे नागालँडच्या राज्यपालाच्या मते जोपर्यंत तेथे किंवा त्याच्या कोणत्याही भागात चालू आहेत तितका काळ त्या राज्यातील कायदा व सुव्यवस्था यांबाबत विशेष जबाबदारी असेल व त्यासंबंधीची आपली कार्ये पार पाडताना करावयाच्या कारवाईबाबत राज्यपाल मंत्रिपरिषदेचा विचार घेतल्यानंतर आपल्या वैयक्तिक निर्णयशक्तीचा वापर करील.

---

3. हा अनुच्छेद जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.

7. "संविधान (तेरावे विशोधन) अधिनियम, १९६२" कलम २ द्वारे घातले (१ डिसेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).



परंतु, जर कोणतीही बाब ही जिच्याबाबत ह्या उपखंडाखाली राज्यपालाने आपली वैयक्तिक निर्णयशक्ती वापरून कार्य करणे आवश्यक आहे अशी बाब आहे की नाही असा प्रश्न उद्भवला तर, राज्यपालाचा स्वविवेकानुसारी निर्णय अंतिम असेल व त्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यता ही त्याने आपली निर्णयशक्ती वापरून कार्य करावयास हवे होते किंवा नको होते ह्या कारणावरून प्रश्नास्पद करता येणार नाही.

परंतु, आणखी असे की, जर नागालँड राज्यातील कायदा व सुव्यवस्था याबाबत राज्यपालावर विशेष जबाबदारी असण्याची यापुढे जरूरी नाही यासंबंधी राष्ट्रपतींची राज्यपालाकडून अहवाल मिळाल्यावरून किंवा अन्यथा खात्री झाली तर, तो आदेशाद्वारे, राज्यपालावरची अशी जबाबदारी आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून संपुष्टात येईल असे निदेशित करू शकेल.

(ग) कोणत्याही अनुदानार्थ मागणीसंबंधी आपली शिफारस करताना, नागालँडचा राज्यपाल कोणत्याही विशिष्ट सेवेसाठी किंवा प्रयोजनासाठी भारत सरकारने भारताच्या एकत्रित निधीतून पुरविलेल्या कोणत्याही पैशाचा समावेश त्या सेवेशी किंवा प्रयोजनाशी संबंधित असलेल्या अनुदानार्थ मागणीत असेल व अन्य कोणत्याही मागणीत असणार नाही अशी खात्रीलायक तजवीज करील.

(घ) ट्यूएनसांग जिल्ह्याकरता पस्तीस सदस्य मिळून बनलेली एक प्रादेशिक परिषद नागालँडचा राज्यपाल जाहीर अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा दिनांकी व तेव्हापासून स्थापन करण्यात येईल व राज्यपाल स्वविवेकानुसार पुढील गोष्टींकरता उपबंध करणारे नियम करील :—

(एक) प्रादेशिक परिषदेची घडण व प्रादेशिक परिषदेचे सदस्य जीनुसार निवडले जातील ती पद्धत;

परंतु, ट्यूएनसांग जिल्ह्याचा उपआयुक्त हा प्रादेशिक परिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल आणि प्रादेशिक परिषदेचा उपाध्यक्ष तिच्या सदस्यांकरवी त्यांच्यामधून निवडून दिला जाईल.

(दोन) प्रादेशिक परिषदेचे सदस्य म्हणून त्या पदावर निवडले जाण्यासाठी किंवा राहण्यासाठी लागणाऱ्या अर्हता.

(तीन) प्रादेशिक परिषदेच्या सदस्यांचा पदावधी व सदस्यांना काही पगार व भत्ते प्रदेय असल्यास ते.

(चार) प्रादेशिक परिषदेची कार्यपद्धती व तिच्या कामकाजाचे चालन.

(पाच) प्रादेशिक परिषदेच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांच्या सेवा शर्ती, आणि

(सहा) प्रादेशिक परिषद घटित करण्यासाठी आणि तिचे कार्य योग्य प्रकारे चालण्यासाठी जिच्याबाबत नियम करणे आवश्यक आहे अशी अन्य कोणतीही बाब.

(२) या संविधानात काहीही असले तरी, नागालँड राज्याच्या निर्मितीच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीपर्यंत किंवा राज्यपाल या संबंधात प्रादेशिक परिषदेच्या शिफारशीवरून जाहीर अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा आणखी कालावधीपर्यंत :—

(क) ट्यूएनसांग जिल्ह्याचे प्रशासन राज्यपालाकडून चालवले जाईल ;

(ख) संबंध नागालँड राज्याच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी भारत सरकारने नागालँडच्या शासनाला काही पैसा पुरवला असेल त्याबाबतीत, राज्यपाल स्वविवेकानुसार त्या पैशाची ट्यूएनसांग जिल्हा व उर्वरित राज्य यांच्यामध्ये समन्यायानुसार वाटणी करण्याची व्यवस्था करील ;

(ग) नागालँड विधानमंडळाचा कोणताही अधिनियम, राज्यपालाने प्रादेशिक परिषदेच्या शिफारशीवरून जाहीर अधिसूचनेद्वारे तसे निदेशित केल्याशिवाय ट्यूएनसांग जिल्ह्यास लागू होणार नाही व अशा कोणत्याही अधिनियमाबाबत असा निदेश देताना राज्यपाल, तो अधिनियम ट्यूएनसांग जिल्ह्यास किंवा त्याच्या कोणत्याही भागास लागू होताना प्रादेशिक परिषदेच्या शिफारशीवरून राज्यपाल विनिर्दिष्ट करील अशा अपवादांसह किंवा अपरिवर्तनांसह परिणामक होईल असे निदेशित करू शकेल.

परंतु, ह्या उपखंडाखाली दिलेला कोणताही निर्देश, त्याला भूतलक्षी परिणाम असेल अशा प्रकारे देता येईल.



(घ) राज्यपालाला ट्यूएनसांग जिल्ह्यात शांतता नांदावी, त्याची प्रगती व्हावी व त्याचे शासन सुविहित व्हावे यासाठी विनियम करता येतील व याप्रमाणे केलेल्या कोणत्याही विनियमाद्वारे, त्या जिल्ह्यास त्या त्या काळी जो लागू असेल अशा कोणत्याही संसदीय अधिनियमाचे किंवा अन्य कोणत्याही कायद्याचे, जरूर तर भूतलक्षी परिणामासह, निरसन किंवा विशोधन करता येईल;

(ङ) (एक) नागालँडच्या विधानसभेत ट्यूएनसांग जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांपैकी एक सदस्य मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यावरून ट्यूएनसांग विषयक व्यवहार मंत्री म्हणून राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल व मुख्यमंत्री आपला सल्ला देताना पूर्वोक्त सदस्यांपैकी बहुसंख्यांकांच्या शिफारशीनुसार वागेल[1];

(दोन) ट्यूएनसांग विषयक व्यवहार मंत्री ट्यूएनसांग जिल्ह्यासंबंधीच्या सर्व बाबींसंबंधी कार्यवाही करील व त्याबाबत त्याला राज्यपालाशी थेट संपर्क साधता येईल, पण मुख्यमंत्र्यास त्याविषयी तो माहिती देत राहील;

(च) ह्या खंडाच्या पूर्वगामी उपबंधात काहीही असले तरी, ट्यूएनसांग जिल्ह्यासंबंधीच्या सर्व बाबींवर राज्यपाल स्वविवेकानुसार अंतिम निर्णय करील;

(छ) अनुच्छेद ५४ व ५५ आणि अनुच्छेद ८० खंड (४) यामध्ये राज्याच्या विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांसंबंधीच्या किंवा अशा प्रत्येक सदस्यासंबंधीच्या निर्देशामध्ये ह्या अनुच्छेदाखाली स्थापन झालेल्या प्रादेशिक परिषदेने निवडून दिलेल्या

---

1. "संविधान (अडचणीचे निवारण) आदेश, क्रमांक १०" चा परिच्छेद २ (१ डिसेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून) यामध्ये असा उपबंध आहे की, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३७१ क हा जणू काही त्याच्या खंड (२) च्या उपखंड (ङ) च्या परिच्छेद (एक) मध्ये पुढील परंतुकाची भर घातलेली असावी त्याप्रमाणे परिणामक होईल, ते असे—

"परंतु, नागालँडच्या विधानसभेत ट्यूएनसांग जिल्ह्यास नेमून दिलेल्या जागा भरण्यासाठी कायद्यानुसार व्यक्ती निवडल्या जाईपर्यंत, राज्यपाल कोणत्याही व्यक्तीला ट्यूएनसांग विषयक व्यवहार मंत्री म्हणून त्या नात्याने कार्य करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यावरून नियुक्त करू शकेल."

नागालँडच्या विधानसभेच्या सदस्यांसंबंधीचे किंवा सदस्यासंबंधीचे निर्देश समाविष्ट असतील;

(ज) अनुच्छेद १७० मध्ये :—

(एक) खंड (१) हा नागालँडच्या विधानसभेच्या संबंधात, त्यामध्ये "साठ" ह्याऐवजी जणू काही "सेहेचाळीस" असा शब्दोल्लेख घातलेला असावा त्याप्रमाणे परिणामक होईल,

(दोन) उक्त खंडात, त्या राज्यातील क्षेत्रीय मतदारसंघातून होणाऱ्या प्रत्यक्ष निवडणुकीसंबंधीच्या निर्देशात ह्या अनुच्छेदाखाली स्थापन झालेल्या प्रादेशिक परिषदेच्या सदस्यांमार्फत होणारी निवडणूक समाविष्ट असेल.

(तीन) खंड (२) व (३) मध्ये, क्षेत्रीय मतदारसंघासंबंधीच्या निर्देशांचा अर्थ कोहिमा व मोकोकचुंग जिल्ह्यांच्या क्षेत्रीय मतदारसंघासंबंधीचे निर्देश असा असेल.

(३) जर या अनुच्छेदातील पूर्वगामी उपबंधांपैकी कोणतीही उपबंध कार्यान्वित करताना कोणतीही अडचण उद्भवली तर, राष्ट्रपतीला ती अडचण दूर करण्यासाठी स्वतःला जरूर वाटेल अशी कोणतीही गोष्ट (अन्य कोणत्याही अनुच्छेदाचे अनुकूलन किंवा अपरिवर्तन यासुद्धा) आदेशाद्वारे करता येईल.

परंतु, नागालँड राज्याच्या निर्मितीच्या दिनांकापासून तीन वर्षे संपल्यानंतर असा कोणताही आदेश केला जाणार नाही.

(स्पष्टीकरण.—कोहिमा, मोकोकचुंग व ट्यूएनसांग जिल्हे यांना-"नागालँड राज्य अधिनियम, १९६२" मध्ये असतील तेच अर्थ या अनुच्छेदात असतील.)

**आसाम राज्याबाबत विशेष उपबंध**

[2]**३७१. ख.** या संविधानात काहीही असले तरी, आसाम राज्याबाबत आदेश करून त्याद्वारे राष्ट्रपतीला, सहावी अनुसूची-परिच्छेद २० यासोबत जोडलेल्या तक्त्यातील [3](भाग १ ला) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जनजाती

2. "संविधान (बावीसावे विशोधन) अधिनियम, १९६९" कलम ४ द्वारे घातले.
3. "ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१" कलम ७१ द्वारे "भाग क" या शब्दाऐवजी घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).



क्षेत्रांतून निवडून आलेले त्या राज्याच्या विधानसभेचे सदस्य व त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या संख्येइतके त्या विधानसभेचे अन्य सदस्य मिळून बनलेल्या, त्या विधानसभेच्या समितीची घटना व कार्ये यांकरता आणि अशी समिती घटित करण्यासाठी व तिचे कार्य योग्यप्रकारे चालण्यासाठी त्या विधानसभेच्या कार्यपद्धती-नियमात आपरिवर्तने करण्याकरता उपबंध करता येईल.

**[1]मणिपूर राज्याबाबत विशेष उपबंध**

[1]३७१. (ग) (१) या संविधानात काहीही असले तरी, मणिपूर-राज्याबाबत आदेश करून त्याद्वारे राष्ट्रपतीला, त्या राज्याच्या डोंगरी क्षेत्रांमधून निवडून आलेले त्या राज्याच्या विधानसभेचे सदस्य मिळून बनलेल्या त्या विधानसभेच्या समितीची घटना व कार्ये यांकरता, शासकीय कामकाजाच्या नियमांत आणि त्या राज्याच्या विधानसभेच्या कार्यपद्धती-नियमांत आपरिवर्तने करण्याकरता आणि अशा समितीचे कार्य योग्य प्रकारे चालण्याची निश्चिती करण्याकरता राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपवण्याबाबत उपबंध करता येईल.

(२) राज्यपाल दरवर्षी, किंवा जेव्हा जेव्हा राष्ट्रपती याप्रमाणे आवश्यक करील तेव्हा तेव्हा, मणिपूर राज्यातील डोंगरी क्षेत्राच्या प्रशासनासंबंधी राष्ट्रपतीला अहवाल देईल आणि उक्त क्षेत्रांच्या प्रशासनासंबंधी त्या राज्यास निदेश देणे हे संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येईल.

**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदात "डोंगरी क्षेत्रे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, राष्ट्रपती आदेशाद्वारे डोंगरी क्षेत्रे म्हणून घोषित करील अशी क्षेत्रे असा आहे.

1. 'संविधान (सत्ताविसावे विशोधन) अधिनियम, १९७१[1] कलम ५ द्वारे घातले (१५ फेब्रुवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

## पाचवी अनुसूची[1]

[अनुच्छेद २४४ (१)]

## अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जनजाती यांचे प्रशासन व नियंत्रण याबाबत उपबंध

### भाग क

### सर्वसाधारण

१. **निर्वचन.**—ह्या अनुसूचित, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर, "राज्य" [2]. . . . या शब्दप्रयोगात [4](आसाम व मेघालय या राज्यांचा) समावेश नाही.

२. **अनुसूचित क्षेत्रात राज्याची शासनशक्ती.**—ह्या अनुसूचीच्या उपबंधांच्या अधीनतेने, राज्याची शासनशक्ती त्यातील अनुसूचित क्षेत्रांवर व्याप्त आहे.

३. **अनुसूचित क्षेत्रांच्या प्रशासनाविषयी राज्यपालाकडून : [3]. . . . राष्ट्रपतीला अहवाल.**—अनुसूचित क्षेत्र असलेल्या प्रत्येक राज्याचा राज्यपाल [3]. . . वर्षाकाठी, किंवा राष्ट्रपती तसे आवश्यक करील तेव्हा तेव्हा, त्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रांच्या प्रशासनाविषयी राष्ट्रपतीला अहवाल देईल आणि उक्त क्षेत्रांच्या प्रशासनाबाबत राज्याला निदेश देणे हे संघराज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येईल.

### भाग ख

### अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जनजाती यांचे प्रशासन व नियंत्रण

४. **जनजाती सल्लागार परिषद :**—(१) अनुसूचित क्षेत्रे असलेल्या प्रत्येक राज्यात आणि राष्ट्रपतीने तसे निर्देशित केल्यास, अनुसूचित जनजाती

1. जम्मू व काश्मीर राज्याला लागू नाही.
2. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलम २९ व अनुसूची याद्वारे "या शब्द प्रयोगाचा अर्थ पहिल्या अनुसूचीच्या भाग क किंवा भाग ख मध्ये विनिर्दिष्ट केलेले राज्य असा आहे, पण" हा मजकूर गाळला.
3. कित्ता–कलम २९ व अनुसूची याद्वारे "किंवा" हा शब्द व 'राजप्रमुख' याचा उल्लेख गाळला.
4. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' कलम ७१ द्वारे "आसाम राज्याचा" या शब्दाऐवजी घातले (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हांपासून).



असलेल्या पण अनुसूचित क्षेत्रे नसलेल्या कोणत्याही राज्यात विसाहून अधिक नाहीत इतके सदस्य मिळून बनलेली एक 'जनजाती सल्लागार परिषद' असेल व त्यांच्यापैकी शक्य होईल तितपत जवळ जवळ तीन चतुर्थांश सदस्य अनुसूचित जनजातींचे त्या राज्याच्या विधानसभेतील प्रतिनिधी असतील.

परंतु, जर राज्याच्या विधानसभेतील अनुसूचित जनजातींच्या प्रतिनिधींची संख्या ही, जनजाती सल्लागार परिषदेत अशा प्रतिनिधींनी भरावयाच्या जागांच्या संख्येहून कमी असेल तर, उरलेल्या जागा त्या जनजातींमधील अन्य व्यक्तींकडून भरल्या जातील.

(२) राज्यपालाकडून [5] . . . जनजाती सल्लागार परिषदेकडे निर्देशिल्या जातील अशा, राज्यातील अनुसूचित जनजातींचे कल्याण व उन्नती यासंबंधीच्या बाबींवर सल्ला देणे हे तिचे कर्तव्य असेल.

(३) राज्यपालाला[3] . . .

(क) परिषदेच्या सदस्यांची संख्या, त्यांच्या नियुक्तीची आणि परिषदेचा अध्यक्ष आणि तिचे अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीची पद्धत ;

(ख) तिच्या बैठकीचे चालन आणि तिची सर्वसाधारण कार्यपद्धती, आणि

(ग) अन्य सर्व आनुषंगिक बाबी ;

प्रकरणपरत्वे, विहित किंवा विनियमित करण्यासाठी नियम करता येतील.

५. अनुसूचित क्षेत्रांना लागू असणारा कायदा.—(१) या संविधानात काहीही असले तरी, तो राज्यपाल [6] . . . जाहीर अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा एखादा विशिष्ट अधिनियम त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या

3. कित्ता–कलम २९ व अनुसूची याद्वारे "किंवा" हा शब्द व "राजप्रमुख" याचा उल्लेख गाळला.
5. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलमे २९ व अनुसूची याद्वारे "किंवा प्रकरणपरत्वे, राजप्रमुखाकडून" हे शब्द गाळले.
6. कित्ता–कलम २९ व अनुसूची याद्वारे "किंवा तो राजप्रमुख" हे शब्द गाळले.

भागाला लागू असणार नाही, अथवा त्या अधिसूचनेत तो विनिर्दिष्ट करील अशा अपवादांसह व आपरिवर्तनांसह त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असेल आणि या पोटपरिच्छेदाखाली देण्यात येणारा कोणताही निदेश भूतलक्षी परिणामासह देता येईल.

(२) राज्यपालाला [1] . . . त्या राज्यातील त्या त्या काळी जे अनुसूचित क्षेत्र असेल अशा कोणत्याही क्षेत्रात शांतता नांदावी व त्याचे शासन सुविहित व्हावे यासाठी विनियम करता येतील.

विशेषत : आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांद्वारे :—

(क) अशा क्षेत्रातील अनुसूचित जनजातींतील व्यक्तींकडून किंवा त्यांच्यामध्ये आपसात जमिनीचे हस्तांतरण होण्यास मनाई करता येईल. किंवा त्यावर निर्बंध घालता येईल,

(ख) अशा क्षेत्रातील अनुसूचित जनजातींमधील व्यक्तींना द्यावयाची जमिनीची वाटणी विनियमित करता येईल ;

(ग) अशा क्षेत्रातील अनुसूचित जनजातींमधील व्यक्तींना ज्या व्यक्ती पैसे कर्जाऊ देतात त्यांनी सावकार म्हणून धंदा चालवण्याबाबत विनियमन करता येईल.

(३) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (२) मध्ये निर्दिष्ट केलेला असा कोणताही विनियम करताना, राज्यपालाला [1] . . . त्या त्या काळी संबंधित क्षेत्राला लागू असेल असा संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा कोणताही अधिनियम किंवा असा कोणताही विद्यमान कायदा निरसित किंवा विशोधित करता येईल.

(४) या परिच्छेदाखाली करण्यात आलेले सर्व विनियम तत्काळ राष्ट्रपतीकडे सादर करण्यात येतील आणि, तो त्यास अनुमती देईपर्यंत, ते कोणत्याही प्रकारे परिणामक होणार नाहीत.

---

1. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलम २९ व अनुसूची याद्वारे "किंवा" हा शब्द व "राजप्रमुख" याचा उल्लेख गाळला.

1. 'संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६' कलम २९ व अनुसूची याद्वारे "किंवा" हा शब्द व 'राजप्रमुख' याचा उल्लेख गाळला.



(५) या परिच्छेदाखाली कोणताही विनियम, जेथे राज्यासाठी जनजाती सल्लागार परिषद असेल त्या बाबतीत, तो विनियम करणाऱ्या राज्यपालाने [1] . . . अशा परिषदेचा सल्ला घेतला असल्याखेरीज केला जाणार नाही.

## भाग ग

### अनुसूचित क्षेत्रे

(६) **अनुसूचित क्षेत्रे** :—(१) या संविधानात "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, राष्ट्रपती[2] आदेशाद्वारे अनुसूचित क्षेत्रे म्हणून घोषित करील अशी क्षेत्रे असा आहे.

(२) राष्ट्रपती कोणत्याही वेळी [3]आदेशाद्वारे :—

(क) संपूर्ण अनुसूचित क्षेत्र किंवा त्याचा कोणताही विनिर्दिष्ट भाग हा अनुसूचित क्षेत्र किंवा अशा क्षेत्राचा भाग असण्याचे समाप्त होईल असे निर्देशित करू शकेल,

[4](कक) एखाद्या राज्यातील कोणत्याही अनुसूचित क्षेत्राचा विस्तार त्या राज्याच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर वाढवू शकेल ;

(ख) कोणत्याही अनुसूचित क्षेत्रात फेरबदल—पण फक्त सीमांच्या दुरुस्तीच्याच रूपाने करू शकेल ;

(ग) राज्याच्या सीमांमध्ये कोणताही फेरबदल झाल्यावर अथवा नवीन राज्याला संघराज्यात प्रवेश दिल्यावर किंवा त्याची स्थापना झाल्यावर कोणत्याही राज्यात पूर्वी समाविष्ट नसलेले कोणतेही क्षेत्र अनुसूचित क्षेत्र असल्याचे किंवा त्याचा भाग असल्याचे घोषित करू शकेल ;

---

2. पहा, 'अनुसूचित क्षेत्रे (भाग क राज्ये) आदेश, १९५०' (सी. ओ.९) व 'अनुसूचित क्षेत्रे (भाग ख राज्ये) आदेश, १९५०' (सी.ओ.२६)

3. पहा, 'मद्रास अनुसूचित क्षेत्रे (विराम) आदेश, १९५०' (सी. ओ. ३०) व "आंध्र अनुसूचित क्षेत्रे (भाग ख राज्ये) आदेश, १९५०' (सी.ओ.५०)

4. 'संविधान पाचवी अनुसूची (विशोधन) अधिनियम, १९७६' कलम २ द्वारे घातले.

[4](घ) या परिच्छेदाअन्वये करण्यात आलेला किंवा आलेले कोणतेही आदेश कोणत्याही राज्याच्या किंवा राज्यांच्या संबंधात विखंडित करू शकेल, आणि संबंधित राज्याच्या राज्यपालाचा विचार घेऊन, जी क्षेत्रे अनुसूचित क्षेत्रे समजावयाची ती नव्याने निश्चित करणारे नवीन आदेश देऊ शकेल, )

आणि अशा कोणत्याही आदेशात राष्ट्रपतीला जरूर व उचित वाटतील असे आनुषंगिक व परिणामी उपबंध अंतर्भूत असू शकतील, पण पूर्वोक्तवत असेल ते खेरीजकरून, ह्या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) खाली केलेल्या कोणत्याही आदेशात नंतरच्या कोणत्याही आदेशाद्वारे फरक केला जाणार नाही.

## भाग घ

### अनुसूचीचे विशोधन

**(७) अनुसूचीचे विशोधन** :—(१) संसदेला या अनुसूचीत असलेल्या-पैकी कोणताही उपबंध कायद्याद्वारे वेळोवेळी त्यात भर घालून, बदल करून किंवा निरसन करून त्याद्वारे विशोधित करता येईल आणि, जेव्हा ही अनुसूची याप्रमाणे विशोधित होईल तेव्हा, या अनुसूचीसंबंधी या संविधानात असलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, याप्रमाणे विशोधित झालेल्या अशा अनुसूचीसंबंधीचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(२) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) मध्ये उल्लेखिलेला असा कोणताही कायदा हा अनुच्छेद ३६८ च्या प्रयोजनार्थ या संविधानाचे विशोधन असल्याचे मानले जाणार नाही.

4. 'संविधान पाचवी अनुसूची (विशोधन) अधिनियम, १९७६'–कलम २ द्वारे घातले.



# सहावी अनुसूची[1]

[अनुच्छेद २४४ (२) आणि २७५ (१)]

**[2] (आसाम व मेघालय या राज्यामधील व मिझोरम या संघ राज्यक्षेत्रामधील जनताती-क्षेत्रांच्या प्रशासनाबाबत उपबंध)**

**१. स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश** :— (१) या परिच्छेदाच्या उपबंधाच्या अधीनतेने, या अनुसूचीच्या परिच्छेद २० सोबत जोडलेल्या तक्त्यातील [3] (भाग १ ला, २ रा व ३ रा यामधील) प्रत्येक नोंदीतील जनजाती क्षेत्रांचा एकेक स्वायत्त जिल्हा बनेल.

(२) जर एखाद्या स्वायत्त जिल्ह्यामध्ये निरनिराळ्या अनुसूचित जनजाती असतील तर, त्यांनी वस्ती केलेल्या क्षेत्राची किंवा क्षेत्रांची राज्य-पालाला जाहीर अधिसूचनेद्वारे स्वायत्त प्रदेशात विभागणी करता येईल.

(३) राज्यपालाला जाहीर अधिसूचनेद्वारे :—

(क) उक्त तक्त्यातील [3] (भागांपैकी कोणत्याही भागामध्ये) कोणतेही क्षेत्र समाविष्ट करता येईल,

(ख) उक्त तक्त्यातील [3] (भागांपैकी कोणत्याही भागामधून) कोणतेही क्षेत्र वगळता येईल,

(ग) नवीन स्वायत्त जिल्हा निर्माण करता येईल,

(घ) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याचे क्षेत्र वाढवता येईल,

(ङ) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याचे क्षेत्र घटवता येईल,

(च) दोन किंवा अधिक स्वायत्त जिल्हे किंवा त्यांचे भाग एकत्र स्वायत्त जिल्हा निर्माण करता येईल.,

[5][(चच) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याच्या नावात फेरबदल करता येईल,]

(छ) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याच्या सीमा निश्चित करता येतील,

1. जम्मू व काश्मीर राज्याला लागू नाही.
2. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १८७१,' कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे "आसाममधील" या शब्दाएवजी घातले (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हापासून)
3. कित्ता–कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे 'भाग क' याच्याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हांपासून)
5. आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९ (१९६९ चा ५५)' कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हांपासून)

परंतु, राज्यपाल ह्या पोटपरिच्छेदाच्या खंड (ग), (घ), (ङ), व (च) खाली द्यावयाचा कोणताही आदेश, या अनुसूचीच्या १४ व्या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) खाली नियुक्त झालेल्या आयोगाचा अहवाल विचारात घेतल्याखेरीज देणार नाही.

[4][परंतु आणखी असे की, या पोटपरिच्छेदाखाली राज्यपालाने दिलेल्या कोणत्याही आदेशात, राज्यपालाला त्या आदेशाचे उपबंध कार्यान्वित करण्याकरता जरुर असल्याचे वाटतील असे आनुषंगिक व परिणामी उपबंध (परिच्छेद २० चे किंवा उक्त तक्त्यात असलेल्यापैकी कोणत्याही भागातील कोणत्याही बाबींचे कोणतेही विशोधन यासुद्धा) अंतर्भूत असू शकतील.]

**२. जिल्हा परिषदा व प्रादेशिक परिषदा यांची घटना :** [6][ (१) प्रत्येक स्वायत्त जिल्ह्यासाठी तिसाहून अधिक नाहीत इतके सदस्य मिळून बनलेली एकेक जिल्हा परिषद असेल, त्यापैकी जास्तीत जास्त चार सदस्य राज्यपालाकडून नामनिर्देशित केले जातील व बाकीचे सदस्य प्रौढ मताधिकारी तत्वावर निवडून दिले जातील.]

(२) या अनुसूचीच्या परिच्छेद १ च्या पोटपरिच्छेद (२) खाली स्वायत्त प्रदेश म्हणून घटित झालेल्या प्रत्येक क्षेत्रासाठी एकेक अलग प्रादेशिक परिषद असेल.

(३) प्रत्येक जिल्हा परिषद आणि प्रत्येक प्रादेशिक परिषद अनुक्रमे "(जिल्ह्याचे नाव) जिल्हा परिषद" आणि "(प्रदेशाचे नाव) प्रादेशिक परिषद" ह्या नावाचा निगम निकाय असेल, तिला उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि उक्त नावाने ती दावा लावील व तिच्यावर दावा लावला जाईल.

(४) या अनुसूचीच्या उपबंधांच्या अधीनतेने, स्वायत्त जिल्ह्यासंबंधीचा प्रशासनाधिकार, जेथवर तो या अनुसूचीखाली अशा जिल्ह्यातील कोणत्याही प्रादेशिक परिषदेच्या ठायी निहीत झालेला नाही तेथवर, अशा

4. कित्ता–कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे घातले (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हांपासून)
6. कित्ता–कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे मूळ पोटपरिच्छेद (१) ऐवजी घातले (२ एप्रिल १९७० रोजी व तेव्हांपासून).



जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या ठायी निहीत होईल आणि स्वायत्त प्रदेशासंबंधीचा प्रशासनाधिकार अशा प्रदेशाच्या प्रादेशिक परिषदेच्या ठायी निहीत होईल.

(५) प्रादेशिक परिषदा असलेल्या स्वायत्त जिल्ह्यात, प्रादेशिक परिषदेच्या हुकमतीखालील क्षेत्रांसंबंधी जिल्हा परिषदेला, या अनुसूचीद्वारे तिला अशा क्षेत्रांसंबंधी प्रदान केलेल्या शक्तीच्या व्यतिरिक्त प्रादेशिक परिषद तिच्याकडे प्रत्यायोजित करील अशा शक्ती असतील.

(६) संबंधित स्वायत्त जिल्ह्यात किंवा प्रदेशात अस्तित्वात असलेल्या जनजाती परिषदा किंवा अन्य प्रातिनिधिक जनजाती-संघटना यांचा विचार घेऊन राज्यपाल जिल्हा परिषदा आणि प्रादेशिक परिषदा प्रथमतः घटित करण्यासाठी नियम करील, आणि अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींकरता उपबंध करण्यात येईल :—

(क) जिल्हा परिषदा आणि प्रादेशिक परिषदा यांची घडण व त्यांतील जागांची वाटणी ;

(ख) त्या परिषदांच्या निवडणुकांसाठी क्षेत्रीय मतदारसंघाचे परिसीमन,

(ग) अशा निवडणुकांमधील मतदानासाठी लागणारी अर्हता आणि त्याकरता मतदार याद्या तयार करणे,

(घ) अशा परिषदांचे सदस्य म्हणून अशा निवडणुकांमध्ये निवडून येण्यासाठी लागणारी अर्हता,

(ङ) [1](प्रादेशिक परिषदांच्या) सदस्यांचा पदावधी,

(च) अशा परिषदांच्या नामनिर्देशनांच्या किंवा निवडणुकांच्या संबंधीची किंवा त्यांच्याशी निगडित असलेली अन्य कोणतीही बाब,

(छ) जिल्हा व प्रादेशिक परिषदांमधील कार्यपद्धती व कामकाजाचे चालन [2](कोणतीही जागा रिक्त असली तरी कार्य करण्याची शक्ती धरून),

(ज) जिल्हा व प्रादेशिक परिषदांच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती,

1. 'आसाम पुनरंचना (मेघालय) अधिनियम, १९६९' (१९६९ चा ५५) कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हांपासून)
2. कित्ता–कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे घातले (२ एप्रिल १९७० रोजी व तेव्हापासून)

[2][(६क) जिल्हा परिषदेचे निवडून आलेले सदस्य परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर परिषदेच्या पहिल्या सभेसाठी नियत केलेल्या दिनांकापासून पाच वर्षाच्या अवधीपर्यंत तत्पूर्वी परिच्छेद १६ खाली जिल्हा परिषद विसर्जित झाली नाही तर पद धारण करतील आणि नामनिर्देशित सदस्य राज्यपालांची मर्जी असेपर्यंत पद धारण करील.

परंतु, आणीबाणीची उद्घोषणा जारी असताना किंवा ज्यामुळे राज्यपालाच्या मते, निवडणुका घेणे अव्यवहार्य होईल अशी परिस्थिती अस्तित्वात असल्यास, उक्त पाच वर्षाचा कालावधी, राज्यपालाला एका वेळी एक वर्षाहून अधिक नाही इतक्या कालावधीपर्यंत आणि आणीबाणीची उद्घोषणा जारी असेल अशा कोणत्याही बाबतीत, उद्घोषणा जारी असण्याचे बंद झाल्यानंतर सहा महिन्यांहून अधिक नाही इतक्या कालावधीपर्यंत वाढवता येईल.

परंतु आणखी असे की, निमित्तवशात रिक्त होणारी जागा भरण्याकरता निवडून दिलेला सदस्य, ज्याच्या जागी तो आला असेल त्या सदस्याच्या ठरलेल्या पदावधीपर्यंत पद धारण करील;]

(७) जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदेला ती प्रथमतः घटित झाल्यानंतर या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींविषयी[2] (राज्यपालाची मान्यता घेऊन) नियम करता येतील आणि

(क) दुय्यम स्थानिक परिषदा किंवा मंडळे यांची रचना आणि त्यांची कार्यपद्धती व त्यांच्या कामकाजाचे चालन, आणि

(ख) सर्वसाधारणतः जिल्हा किंवा प्रकरणपरत्वे, प्रदेश यांच्या प्रशासनासंबंधीचे कामकाज चालवण्याशी संबंधित असलेल्या सर्व बाबी ;

यांचे विनियमन करणारे नियमही [2](तशीच मान्यता घेऊन) करता येतील :—

---

2. किता–कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ एप्रिल १९७० रोजी व तेव्हांपासून)



परंतु, या पोटपरिच्छेदाखाली जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदांकडून नियम केले जाईपर्यंत, या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (६) खाली राज्यपालाने केलेले नियम अशा प्रत्येक परिषदेच्या निवडणुका आणि तिचे पदाधिकारी व कर्मचारी वर्ग आणि तिची कार्यपद्धती व तिच्यातील कामकाजाचे चालन यांच्या संबंधात परिणामक असतील.

[1] . . . . . . . . . . . . .

**३. जिल्हा परिषदा व प्रादेशिक परिषदा यांच्या कायदे करण्याच्या शक्ती.**—(१) एखाद्या स्वायत्त प्रदेशातील सर्व क्षेत्रांबाबत अशा प्रदेशाच्या प्रादेशिक परिषदेला आणि स्वायत्त जिल्ह्यात कोणत्याही प्रादेशिक परिषदा असल्यास त्यांच्या हुकमतीखाली असतील ती खेरीजकरून त्या जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांबाबत जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला पुढील गोष्टींबाबत कायदे करण्याची शक्ती असेल :—

(क) राखीव वन म्हणून असलेल्याहून अन्य कोणत्याही जमिनीची शेतीच्या किंवा चराईच्या प्रयोजनासाठी अथवा निवासाच्या किंवा अन्य बिगरशेतकी प्रयोजनासाठी अथवा कोणत्याही खेड्यातील किंवा शहरातील रहिवाश्यांचे ज्यामुळे हितवर्धन होण्याचा संभव आहे अशा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वाटणी, तावा किंवा वापर अथवा ती वेगळी राखून ठेवणे.

परंतु, अशा कायद्यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही जमिनीचे सक्तीने संपादन करण्याचा प्राधिकार देणाऱ्या त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनांकरता असे संपादन करण्यास[3] (संबंधित राज्याच्या शासनाला) प्रतिबंध होणार नाही.

(ख) राखीव वन सोडून अन्य कोणत्याही वनाची व्यवस्था पाहणे ;

(ग) शेतीच्या प्रयोजनार्थ कोणत्याही कालव्याचा किंवा जलप्रवाहाचा उपयोग ;

---

1. 'आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९' (१९६९ चा ५५)–कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे दुसरे परंतुक गाळले (२ एप्रिल १९७० रोजी व तेव्हापासून)

3. 'ईशान्य क्षेत्र (पुनर्रचना) अधिनियम, १९७१'? १९७१ चा १)-कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे मूळ मजकूराऐवजी घातले. (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून)

(घ) "झूम" किंवा अन्य स्थानपालटाच्या शेतीचे प्रकार यांचे विनियमन ;

(ङ) ग्राम किंवा नगर समित्या किंवा परिषदा यांची स्थापना आणि त्यांच्या शक्ती ;

(च) ग्राम किंवा नगर पोलीस आणि सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता यांसह ग्राम किंवा नगर प्रशासन यासंबंधीचे अन्य कोणतीही बाब ;

(छ) नाईक किंवा मुखिये यांची नियुक्ती किंवा उत्तराधिकार ;

(ज) संपत्तीचा वारसा ;

[2][(झ) विवाह व घटस्फोट] ;

(ञ) सामाजिक रूढी.

(२) या परिच्छेदात, "राखीव वन" याचा अर्थ, जे क्षेत्र "आसाम वन विनियम, १८९१" याखाली किंवा संबंधित क्षेत्रात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील राखीव वन असेल असे कोणतेही क्षेत्र असा आहे.

(३) या परिच्छेदाखाली केलेले सर्व कायदे तत्काळ राज्यपालाला सादर करण्यात येतील आणि, तो त्यास अनुमती देईपर्यंत ते परिणामक होणार नाहीत.

**४. स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश यांतील न्यायदान :**—(१) स्वायत्त प्रदेशातील क्षेत्रांबाबत अशा प्रदेशाच्या प्रादेशिक परिषदेला आणि स्वायत्त-जिल्ह्यात कोणत्याही प्रादेशिक परिषदा असल्यास, त्यांच्या हुकमतीखाली असतील त्याहून अन्य अशा, त्या जिल्ह्यातील क्षेत्रांबाबत जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला, या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या पोटपरिच्छेद (१) चे उपबंध ज्यांना लागू आहेत असे दावे व खटले यांहून अन्य असे, ज्यांच्यापैकी सर्वजण अशा क्षेत्रांमधील अनुसूचित जनजातीचे आहेत त्या पक्षकारांमधील दावे व खटले यांच्या संपरीक्षेसाठी राज्यातील कोणतेही न्यायालय वर्जून ग्रामपरिषदा किंवा न्यायालये घटित करता येतील, आणि अशा ग्रामपरिषदांचे सदस्य किंवा अशा न्यायालयाचे पीठासीन अधिकारी म्हणून सुयोग्य व्यक्तींची नियुक्ती करता येईल, आणि ह्या अनुसूचीच्या परिच्छेद ३ खाली केलेल्या कायद्यांच्या प्रशासनासाठी जरूर असतील अशाही अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

2. किता कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हापासून).



(२) या संविधानात काहीही असले तरी, स्वायत्त प्रदेशाची प्रादेशिक परिषद किंवा प्रादेशिक परिषदेने त्यासंबंधात घटित केलेले कोणतेही न्यायालय, अथवा जर स्वायत्त जिल्ह्यातील कोणत्याही क्षेत्राबाबत कोणतीही प्रादेशिक परिषद नसेल तर, अशा जिल्ह्याची जिल्हा परिषद किंवा जिल्हा परिषदेने त्यासंबंधात घटित केलेले कोणतेही न्यायालय, या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) खाली घटित झालेल्या ग्रामपरिषदेकडून किंवा न्यायालया-कडून, प्रकरणपरत्वे, अशा प्रदेशात किंवा क्षेत्रात संपरीक्षायोग्य असलेले, मात्र या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या पोटपरिच्छेद (१) चे उपबंध ज्यांना लागू होतात त्याहून अन्य असे सर्व दावे व खटले यांच्याबाबत अपील न्यायालयाच्या शक्ती वापरील, आणि उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय खेरीजकरून अन्य कोणत्याही न्यायालयाला अशा दाव्यांवर किंवा खटल्यांवर अधिकारिता असणार नाही.

(३) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (२) चे उपबंध ज्यांना लागू आहेत अशा दाव्यांवर व खटल्यांवर, राज्यपाल वेळोवेळी आदेशाद्वारे विनि-र्दिष्ट करील अशी अधिकारिता [1] ...... उच्च न्यायालयाला असेल व ते ती अधिकारिता वापरील.

(४) प्रादेशिक परिषदेला किंवा प्रकरणपरत्वे, जिल्हा परिषदेला राज्य-पालाची पूर्वमान्यता घेऊन पुढील गोष्टींचे विनियमन करणारे नियम करता येतील :—

(क) ग्राम परिषदा व न्यायालये यांची घटना आणि त्यांनी या परिच्छे-दाखाली वापरावयाच्या शक्ती ;

(ख) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) खाली दाव्यांची व खटल्यांची संपरीक्षा करताना न्यायालयांनी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (२) खाली अपिलांमध्ये व अन्य कार्यवाहीमध्ये, प्रादेशिक किंवा जिल्हा परिषदेने अथवा अशा परिषदेने घटित केलेल्या न्यायालयाने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(घ) अशा परिषदांच्या किंवा न्यायालयांच्या निर्णयाची व आदेशांची बजावणी ;

1. "ईशान्य क्षेत्र (पुनर्रचना) अधिनियम, १९७१" (१९७१ चा ८१) कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे "आसामच्या" हा शब्द गाळला (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हापासून).

(ङ) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) व (२) चे उपबंध कार्यान्वित करण्यास सहाय्यभूत असलेल्या अन्य बाबी.

[3](५) [2](संबंधित राज्याचा विचार घेतल्यानंतर), राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे याबाबत नियत करील अशा दिनांकी व तेव्हापासून, हा परिच्छेद अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्वायत्त जिल्ह्याच्या किंवा प्रदेशाच्या संबंधात अशा प्रकारे परिणामक होईल की, जणू काही :—

(एक) पोटपरिच्छेद (१) मधील "या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या पोनपरिच्छेद (१) चे उपबंध ज्यांना लागू आहेत असे दावे व खटले यांहून अन्य असे, ज्यांच्यापैकी सर्वजण अशा क्षेत्रांमधील अनुसूचित जनजातीचे आहेत त्या पक्षकारांमधील" या शब्दाऐवजी "या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या पोटपरिच्छेद (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे नसतील असे जे दावे व खटले राज्यपाल यासंबंधात विनिर्दिष्ट करील त्यांच्या" हे शब्द घातले होते ;

(दोन) पोटपरिच्छेद (२) व (३) गाळले होते ;

(तीन) पोटपरिच्छेद (४) मध्ये :—

(क) "प्रादेशिक परिषदेला किंवा, प्रकरणपरत्वे जिल्हा परिषदेला राज्यपालाची पूर्वमान्यता घेऊन पुढील गोष्टींचे विनियमन करणारे नियम करता येतील" या शब्दाऐवजी "राज्यपालाला पुढील गोष्टींचे विनियमन करणारे नियम करता येतील" हे शब्द घातले होते, आणि

(ख) खंड (क) ऐवजी पुढील खंड घातला होता, तो असा :—

"(क) ग्राम परिषदा व न्यायालये यांची घटना, त्यांनी या परिच्छेदाखाली वापरावयाच्या शक्ती आणि ग्राम परिषदांच्या व न्यायालयांच्या निर्णयांवर ज्यांच्याकडे अपिले करता येतील ती न्यायालये"

2. किता कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हांपासून).

3. "आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९" (१९६९ चा ५५) कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हांपासून).



(ग) खंड (ग) ऐवजी पुढील खंड घातला होता, तो असा—

"(ग) पोटपरिच्छेद (५) खाली राष्ट्रपतीने नियत केलेल्या दिनांकाच्या निकटपूर्वी प्रादेशिक किंवा जिल्हा परिषदेसमोर अथवा अशा परिषदेने घटित केलेल्या कोणत्याही न्यायालयासमोर प्रलंबित असलेली अपिले आणि अन्य कार्यवाही वर्ग करणे," आणि

(घ) खंड (ङ) मधील "पोटपरिच्छेद (१) व (२) " या मजकुराऐवजी "पोटपरिच्छेद (१)" हा मजकूर घातला होता.

**५. प्रादेशिक व जिल्हा परिषदा आणि विवक्षित न्यायालये व अधिकारी यांना विवक्षित दावे, खटले व अपराध यांच्या संपरीक्षेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ [4]याखाली शक्तींचे प्रदान** :—(१) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यात किंवा प्रदेशात अंमलात असलेला जो कायदा राज्यपालाने त्याबाबत विनिर्दिष्ट केलेला असेल अशा कोणत्याही कायद्यातून उद्‌भवणाऱ्या दाव्यांच्या किंवा खटल्यांच्या संपरीक्षेकरता अथवा "भारतीय दंड संहिते" खाली किंवा अशा जिल्ह्याला किंवा प्रदेशाला त्या त्या काळी लागू असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखाली देहान्त, जन्मठेप किंवा किमान पाच वर्षे इतक्या मुदतीचा कारावास या शिक्षांस पात्र असलेल्या अपराधांच्या संपरीक्षेकरता, राज्यपाल अशा जिल्ह्यावर किंवा प्रदेशावर हुकूमत असलेल्या जिल्हा परिषदेला किंवा प्रादेशिक परिषदेला अथवा अशा जिल्हा परिषदेने घटित केलेल्या न्यायालयाला अथवा राज्यपालाने त्या संबंधात नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" किंवा प्रकरणपरत्वे "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८", [5]याखाली त्याला समुचित वाटतील अशा शक्ती प्रदान करू शकेल, आणि तदनंतर उक्त परिषद, न्यायालय किंवा अधिकारी, याप्रमाणे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून ते दावे, खटले किंवा अपराध यांची संपरीक्षा करील.

(२) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) खाली जिल्हा परिषदेला, प्रादेशिक परिषदेला, न्यायालयाला किंवा अधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेल्यांपैकी कोणतीही शक्ती राज्यपालाला काढून घेता येईल किंवा तीत आपरिवर्तन करता येईल.

4. आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३,' (१९७४ चा २) पहा.

5. आता 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) पहा.

(३) या परिच्छेदाचे उपबंध ज्यास लागू होतात अशा स्वायत्त जिल्ह्यात किंवा कोणत्याही स्वायत्त प्रदेशात कोणतेही दावे, खटले किंवा अपराध यांची जी संपरीक्षा होते तिला "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" आणि "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८" हे या परिच्छेदात स्पष्टपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, एरव्ही लागू असणार नाहीत.

[1](४) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याच्या किंवा स्वायत्त प्रदेशाच्या संबंधात परिच्छेद ४ च्या पोटपरिच्छेद (५) खाली राष्ट्रपतीने नियत केलेल्या दिनांकी व तेव्हापासून या परिच्छेदात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट त्या जिल्ह्यास किंवा प्रदेशास लागू होताना, या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही शक्ती जिल्हा परिषदेला किंवा प्रादेशिक परिषदेला अथवा जिल्हा परिषदेने घटित केलेल्या न्यायालयांना प्रदान करण्यास राज्यपाल तीमुळे प्राधिकृत होतो असे मानले जाणार नाही.

[2]**६. प्राथमिक शाळा, इत्यादी स्थापन करण्याच्या जिल्हा परिषदेच्या शक्ती** :—(१) स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला जिल्ह्यात प्राथमिक शाळा, दवाखाने, बाजार, कोंडवाडे, तरी, मत्स्यक्षेत्रे, सडका, मार्ग परिवहन सेवा आणि जलमार्ग स्थापन करता येतील, बांधता येतील किंवा त्यांचे व्यवस्थापन करता येईल आणि राज्यपालाची पूर्वमान्यता घेऊन, यांचे विनियमन व नियंत्रण यांकरता विनियम करता येतील आणि, विशेषतः जिल्ह्याच्या प्राथमिक शाळांमधून प्राथमिक शिक्षण कोणत्या भाषेतून व कोणत्या रीतीने दिले जावे हे विहित करता येईल.

(२) राज्यपालाला, कोणत्याही जिल्हा परिषदेच्या संमतीने त्या परिषदेकडे किंवा तिच्या अधिकाऱ्याकडे शेती, पशुपालन, सामूहिक प्रकल्प, सहकारी सोसायट्या, समाजकल्याण ग्राम नियोजन किंवा [4] . . . राज्याच्या शासनशक्तीच्या व्याप्तीत येत असेल अशी अन्य कोणतीही बाब यांच्यासंबंधीची कार्ये सशर्त किंवा बिनशर्त सोपवता येतील.

1. 'आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९' (१९६९ चा ५५) कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हांपासून).
2. कित्ता–कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ एप्रिल १९७० रोजी व तेव्हापासून).
4. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८१) कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे 'प्रकरणापरत्वे, आसाम किंवा मेघालय" हे शब्द गाळले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).



**७. जिल्हा व प्रादेशिक निधी** :—(१) प्रत्येक स्वायत्त जिल्ह्यासाठी, एक जिल्हा निधी व प्रत्येक स्वायत्त प्रदेशासाठी एक प्रादेशिक निधी घटित करण्यात येईल व या संविधानाच्या उपबंधानुसार, अशा जिल्ह्याचे किंवा प्रकरणपरत्वे, प्रदेशाचे प्रशासन करत असताना त्या ओघात त्या जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेकडे व त्या प्रदेशाच्या प्रादेशिक परिषदेकडे आलेले सर्व पैसे त्या त्या निधीत जमा केले जातील.

[3](२) जिल्हा निधीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक निधीच्या व्यवस्थापनासाठी आणि उक्त निधीत पैशांचा भरणा करणे, त्यातून पैसे काढणे, त्यातील पैशांची अभिरक्षा करणे आणि पूर्वोक्त बाबींशी संबंधित किंवा त्यास सहाय्यभूत असलेली कोणतीही बाब याबाबत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीसंबंधी राज्यपालाला नियम करता येतील.

(३) जिल्हा परिषदेचे किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिषदेचे लेखे भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक राष्ट्रपतीच्या मान्यतेने विहित करील अशा नमुन्यात ठेवले जातील.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने जिल्हा व प्रादेशिक परिषदांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करवील, आणि अशा लेख्यांसंबंधीचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांचे अहवाल राज्यपालाला सादर करण्यात येतील व तो ते परिषदेपुढे ठेववील.

**८. जमीन-महसूल निर्धारित करून त्याची उगराणी करण्याच्या आणि कर बसवण्याच्या शक्ती** :—(१) स्वायत्त प्रदेशाच्या प्रादेशिक परिषदेला अशा प्रदेशातील सर्व जमिनीबाबत व स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला, जिल्ह्यात कोणत्याही प्रादेशिक परिषदा असल्यास त्यांच्या हुकमतीखालील क्षेत्रांमध्ये असतील त्या खेरीज करून जिल्ह्यातील सर्व जमिनीबाबत [1](सर्वसाधारणतः राज्यात जमीनमहसुलांसाठी जमिनीबाबत निर्धारण करताना राज्याच्या शासनाने) त्या त्या काळी अनुसरलेल्या तत्वानुसार, महसुलाचे निर्धारण करून त्याची उगराणी करण्याची शक्ती असेल.

3. कित्ता-कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे मूळ पोटपरिच्छेद (२) ऐवजी घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हापासून).
1. "ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१" (१९७१ चा ८१) कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे विवक्षित शब्दाऐवजी घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

(२) स्वायत्त प्रदेशाच्या प्रादेशिक परिषदेला अशा प्रदेशातील सर्व क्षेत्रांबाबत आणि स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला, जिल्ह्यात कोणत्याही प्रादेशिक परिषदा असल्यास त्यांच्या हुकमतीखाली असतील ती खेरीजकरून जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांबाबत, अशा क्षेत्रांमधील जमिनीवर व इमारतींवर कर आणि तेथे राहणाऱ्या व्यक्तींवर पथकर आकारण्याची व त्यांची उगराणी करण्याची शक्ती असेल.

(३) स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला अशा जिल्ह्यातील पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही कर आकारण्याची व त्यांची उगराणी करण्याची शक्ती असेल, म्हणजे—

(क) पेशे, उदीम, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर,

(ख) प्राणी, वाहने आणि नौका यावरील कर,

(ग) बाजारात विक्रीसाठी मालाची जी आवक होते तिच्यावरील कर आणि तरीतून ने-आण केल्या जाणाऱ्या उतारूंवरील आणि मालावरील पथकर, आणि

(घ) शाळा, दवाखाने किंवा रस्ते यांच्या देखभालीसाठी कर.

(४) प्रादेशिक परिषदेला किंवा, प्रकरणपरत्वे, जिल्हा परिषदेला या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (२) आणि (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणताही कर आकारण्यासाठी व त्याची उगराणी करण्यासाठी उपबंध करणारे विनियम करता येतील (आणि असा प्रत्येक विनियम तत्काळ राज्यपालाला सादर करण्यात येईल आणि, तो त्यास अनुमती देईपर्यंत तो परिणामक होणार नाही.)

**९. खनिजांसाठी पूर्वेक्षण करण्याच्या किंवा ती काढण्याच्या प्रयोजनार्थ लायसने किंवा भाडेपट्टी** :—(१) स्वायत्त जिल्ह्यातील कोणत्याही क्षेत्राबाबत खनिजांसाठी पूर्वेक्षण करण्याच्या किंवा ती काढण्याच्या प्रयोजनार्थ, [2] (राज्याच्या शासनाने) दिलेली लायसने किंवा भाडेपट्टी यापासून दर वर्षी उपार्जित होणाऱ्या स्वामिस्वांचा [2] (राज्याचे शासन) व जिल्हा परिषद यांच्यामध्ये एकमताने ठरेल असा हिस्सा त्या जिल्हा परिषदेकडे सुपूर्द करण्यात येईल.

---

2. किता-कलम ७१ (ज्ञ) आठवी अनुसूची याद्वारे 'आसामचे शासन' याच्याऐवजी हा उल्लेख घातला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

3. 'आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९' (१९६९ चा ५५)-कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हापासून).



(२) जर अशा स्वामिस्वांपैकी जिल्हा परिषदेकडे सुपूर्त करावयाच्या हिश्श्याबाबत कोणताही तंटा उद्‌भवला तर, तो निर्णयासाठी राज्यपालाकडे निर्देशित केला जाईल आणि राज्यपालाने स्वविवेकानुसार निर्धारित केलेली रक्कम या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) खाली जिल्हा परिषदेला द्यावयाची रक्कम म्हणून निश्चित करण्यात येईल आणि राज्यपालाचा निर्णय अंतिम असेल.

**१०. जनजातीवर व्यक्ती करत असलेल्या सावकारीवर आणि व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विनियम करण्याची जिल्हा परिषदेची शक्ती** :— (१) स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेला जिल्ह्यात राहणाऱ्या, अनुसूचित जनजातीतर व्यक्ती जिल्ह्यात जी सावकारी किंवा व्यापार करतात त्यांचे विनियमन आणि नियंत्रण करण्यासाठी विनियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता अशा विनियमाद्वारे :—

(क) सावकारीसंबंधात देण्यात आलेल्या लायसनाच्या धारकाखेरीज कोणालाही सावकारीचा धंदा चालवता येणार नाही असे विहित करता येईल ;

(ख) सावकार व्याजाचा जो दर आकारू शकेल किंवा ज्या दराने वसुली करू शकेल तो कमाल दर विहित करता येईल ;

(ग) सावकारांनी हिशेब ठेवणे व अशा हिशेबांची तपासणी त्यासंबंधात जिल्हा परिषदेने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी करणे यांकरता उपबंध करता येईल ;

(घ) त्या जिल्ह्यात राहणाऱ्या अनुसूचित जनजातीचा घटक नाही अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही जिनसाच्या घाऊक किंवा किरकोळ व्यापारासंबंधात जिल्हा परिषदेने लायसने दिल्याखेरीज असा व्यापार चालवू शकणार नाही असे विहित करता येईल ;

परंतु, या परिच्छेदाखाली कोणतेही विनियम, जिल्हा परिषदेच्या एकूण सदस्य-संख्येच्या किमान तीन चतुर्थांश इतक्या बहुमताने ते पारित झाल्याशिवाय करता येणार नाहीत.

परंतु, आणखी असे की, विनियम करण्याच्या वेळेच्या **पूर्वीपासून** जो सावकार किंवा व्यापारी जिल्ह्यात धंदा चालवत

आला असेल त्याला लायसन देण्याचे नाकारणे हे अशा कोणत्याही विनियमांनुसार कायदेशीर होणार नाही.

(३) या परिच्छेदाखाली केलेले सर्व विनियम तत्काळ राज्यपालाला सादर करण्यात येतील आणि, तो त्यास अनुमती देईपर्यंत, ते परिणामक होणार नाहीत.

**११. या अनुसूचीखाली केलेल्या कायदयांचे, नियमांचे व विनियमांचे प्रकाशन :—**जिल्हा परिषदेने किंवा प्रादेशिक परिषदेने या अनुसूचीखाली केलेले सर्व कायदे, नियम आणि विनियम तत्काळ राज्याच्या शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील आणि असे प्रकाशन झाल्यावर ते कायद्याइतकेच प्रभावी ठरतील.

१२. [1]**(संसदेचे व आसाम राज्याच्या विधानमंडळाचे अधिनियम आसाम राज्यातील स्वायत्त जिल्हे व स्वायत्त प्रदेश यांना लागू करणे :—** (१) या संविधानात काहीही असले तरी :—

(क) ज्याच्याबाबत जिल्हा परिषदेला किंवा प्रादेशिक परिषदेला कायदे करता येतील अशा बाबी म्हणून या अनुसूचीच्या परिच्छेद ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधीचा [2](आसाम राज्याच्या विधानमंडळाचा) कोणताही अधिनियम आणि न गाळलेल्या मद्यार्कयुक्त दारूचे सेवन मना करणारा किंवा त्यावर निर्बंध घालणारा [2](आसाम राज्याच्या विधानमंडळाचा) कोणताही अधिनियम [3](त्या राज्यातील) कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यास किंवा स्वायत्त प्रदेशास प्रत्येक बाबतीत अशा जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेने किंवा अशा प्रदेशावर अधिकारिता असणाऱ्या जिल्हा परिषदेने जाहीर अधिसूचनेद्वारे तसे निर्देशित केल्याशिवाय, लागू होणार नाही, आणि कोणत्याही अधिनियमाबाबत

1. 'ईशान्य क्षेत्र (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८१)—कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे मूळ शीर्षकाऐवजी घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजीव तेव्हापासून)
2. कित्ता—कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे 'राज्याचे विधानमंडळ' याच्याऐवजी हा उल्लेख घातला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून)
3. कित्ता—कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून)



असा निर्देश देताना जिल्हा परिषद असे निर्देश करू शकेल की, अशा जिल्ह्याला किंवा प्रदेशाला किंवा त्याच्या कोणत्याही भागाला लागू होताना तो अधिनियम तिला योग्य वाटतील अशा अपवादांसह किंवा अपरिवर्तनांसह परिणामक होईल ;

(ख) राज्यपाल जाहीर अधिसूचनेद्वारे असे निर्देशित करू शकेल की, ज्याला या पोटपरिच्छेदाच्या खंड (क) चे उपबंध लागू होत नाहीत असा संसदेचा किंवा [2](आसाम राज्याच्या विधानमंडळाचा) कोणताही अधिनियम, [3](त्या राज्यातील) स्वायत्त जिल्ह्यास किंवा स्वायत्त प्रदेशास लागू असणार नाही, अथवा अशा जिल्ह्याला किंवा प्रदेशाला किंवा त्याच्या एखाद्या भागाला तो जाहीर अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा अपवादांसह किंवा आपरिवर्तनासह लागू होईल.

(२) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) खाली दिला जाणारा कोणताही निदेश भूतलक्षी परिणामासह देता येईल.

[4](**१२ क. संसदेचे व मेघालय राज्याच्या विधानमंडळाचे अधिनियम मेघालय राज्यातील स्वायत्त जिल्ह्यांना व स्वायत्त प्रदेशांना लागू करणे :—**

(क) या अनुसूचीच्या परिच्छेद ३ च्या पोट परिच्छेद (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी मेघालय राज्यातील जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदेने केलेल्या कायद्याचा कोणताही उपबंध अथवा या अनुसूचीचा परिच्छेद १० किंवा परिच्छेद ८ याखाली त्या राज्यातील जिल्हा परिषदेने किंवा प्रादेशिक परिषदेने केलेल्या कोणत्याही विनियमाचा कोणताही उपबंध हा, जर त्या बाबीसंबंधी मेघालय राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या कायद्याच्या कोणत्याही उपबंधास प्रतिकूल असेल तर, जिल्हा परिषदेनें किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिषदेने केलेला कायदा किंवा विनियम—मग तो मेघालय राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या कायद्याच्या आधी केलेला असो वा नंतर

4. कित्ता कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे मूळ परिच्छेद १२ क ऐवजी १२ क व १२ ख हे परिच्छद घातले (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हापासून).

केलेला असो-प्रतिकूलतेच्या व्याप्तीपुरता शून्य होईल आणि मेघालय राज्याच्या विधानमंडळाने केलेला कायदा अधिक प्रभावी ठरेल,

(ख) राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे संसदेच्या कोणत्याही अधिनियमाबाबत असे निदेशित करू शकेल की, तो अधिनियम मेघालय राज्यातील एखाद्या स्वायत्त जिल्ह्यास किंवा स्वायत्त प्रदेशास लागू असणार नाही अथवा अशा जिल्ह्यास किंवा प्रदेशास किंवा त्याच्या एखाद्या भागास तो स्वतः अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा अपवादांसह किंवा आपरिवर्तनांसह लागू होईल आणि असा कोणताही निदेश भूतलक्षी परिणामासह देता येईल.

[1] **१२ ख. संसदेचे आणि मिझोरम संघ राज्य क्षेत्राच्या विधानमंडळाचे अधिनियम मिझोरम संघ राज्यक्षेत्रातील स्वायत्त जिल्ह्यांना व स्वायत्त प्रदेशांना लागू करणे** :—या संविधानात काहीही असले तरी,—

(क) या अनुसूचीच्या परिच्छेद ३ च्या पोटपरिच्छेद (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींसंबंधी मिझोरम संघ राज्यक्षेत्रातील जिल्हा परिषदेने किंवा प्रादेशिक परिषदेने केलेल्या कायद्याचा कोणताही उपबंध अथवा या अनुसूचीचा परिच्छेद ८ किंवा परिच्छेद १० याखाली त्या संघ राज्यक्षेत्रातील जिल्हा परिषदेने किंवा प्रादेशिक परिषदेने केलेल्या कोणत्याही विनियमाचा कोणताही उपबंध हा, जर त्या बाबींसंबंधी मिझोरम संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाने केलेल्या कायद्याच्या कोणत्याही उपबंधास प्रतिकूल असेल तर, जिल्हा परिषदेने किंवा प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिषदेने केलेला कायदा किंवा विनियम– मग तो मिझोरम संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाने केलेल्या कायद्याच्या आधी केलेला असो वा नंतर केलेला असो– प्रतिकूलतेच्या व्याप्तीपुरता शून्य होईल आणि मिझोरम संघ राज्यक्षेत्राच्या विधानमंडळाने केलेला कायदा अधिक प्रभावी ठरेल.

(ख) राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे संसदेच्या कोणत्याही अधिनियमाबाबत असे निदेशित करू शकेल की, तो अधिनियम मिझोरम संघ राज्यक्षेत्रातील एखाद्या स्वायत्त जिल्ह्यास किंवा स्वायत्त प्रदेशास लागू असणार नाही, अथवा अशा जिल्ह्यास किंवा प्रदेशास किंवा त्याच्या एखाद्या भागास तो स्वतः अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा अपवादांसह किंवा आपरिवर्तनांसह लागू होईल आणि असा कोणताही निदेश भूतलक्षी परिणामासह देता येईल.)

1. 'संघ राज्यक्षेत्रांचे शासन ( विशोधन ) अधिनियम, १९७१,' (१९७१ चा ८३) कलम १३ द्वारे मूळ परिच्छेद १२ ख ऐवजी घातले (२९ एप्रिल १९७२ रोजी व तेव्हापासून)



**१३. स्वायत्त जिल्ह्यासंबंधीची अंदाजित जमा व खर्च वार्षिक वित्तीय विवरणपत्रात वेगवेगळे दाखवणे** :— [2]. . . राज्याच्या एकत्रित निधीत जमा करावयाच्या किंवा त्यातून खर्च करावयाच्या असतील अशा रकमांचे स्वायत्त जिल्ह्यासंबंधीचे अंदाज प्रथम जिल्हा परिषदेपुढे चर्चेसाठी ठेवण्यात येतील आणि अशा चर्चेनंतर, अनुच्छेद २०२ खाली राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात त्या रकमा वेगवेगळ्या दाखवल्या जातील.

**१४. स्वायत्त जिल्ह्याच्या आणि स्वायत्त प्रदेशाच्या प्रशासनाची चौकशी करण्यासाठी व त्याबाबत अहवाल देण्यासाठी आयोगाची नियुक्ती** :— (१) राज्यपालाला कोणत्याही वेळी, राज्यातील स्वायत्त जिल्ह्याच्या व स्वायत्त प्रदेशांच्या प्रशासनासंबंधी त्याने विनिर्दिष्ट केलेल्या, या अनुसूचीच्या परिच्छेद १ मधील पोटपरिच्छेद (३) च्या (ग), (घ), (ङ) व (च) या खंडात विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसुद्धा कोणत्याही बाबींची तपासणी करून तीबाबत अहवाल देण्यासाठी आयोगाची नियुक्ती करता येईल, अथवा सर्वसाधारणतः राज्यातील स्वायत्त जिल्ह्यांचे व स्वायत्त प्रदेशांचे प्रशासन आणि विशेषतः—

(क) अशा जिल्ह्यांतील आणि प्रदेशांतील शैक्षणिक व वैद्यकीय सुविधांची तरतूद आणि दळणवळण ;

(ख) अशा जिल्ह्याबाबत आणि प्रदेशांबाबत कोणत्याही नवीन किंवा विशेष विधिविधानाची गरज, आणि

(ग) जिल्हा आणि प्रादेशिक परिषदांनी केलेले कायदे, नियम व विनियम यांचे प्रशासन, यांची चौकशी करून त्यावर वेळोवेळी अहवाल देण्यासाठी आयोगाची नियुक्ती करता येईल व अशा आयोगाने अनुसरावयांची कार्यपद्धती निश्चित करता येईल.

(२) अशा प्रत्येक आयोगाचा अहवाल व त्यासोबत त्याबाबत राज्यपालाने केलेल्या शिफारशी, [3] (राज्याच्या शासनाने) त्यावर जी कारवाई करावी असे योजलेले असेल तिच्याविषयीच्या स्पष्टीकरणात्मक निवेदनासहित संबंधित मंत्र्याकरवी राज्याच्या विधानमंडळापुढे ठेवण्यात येतील.

2. 'ईशान्य क्षेत्र (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८१) कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे 'आसाम' हा शब्द गाळला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

3. कित्ता-कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे 'आसामचे शासन' याच्याऐवजी हा उल्लेख घातला (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हापासून).

(३) आपल्या मंत्र्यामध्ये राज्याच्या शासनाच्या कामाची वाटणी करताना, राज्यपालाला खास करून राज्यातील स्वायत्त जिल्ह्यांच्या आणि स्वायत्त प्रदेशांच्या कल्याणकार्याचा प्रभार आपल्या मंत्र्यांपैकी एकाकडे देता येईल.

**१५. जिल्हा व प्रादेशिक परिषदांच्या कृतीचे व ठरावांचे शून्यीकरण किंवा निलंबन :—**(१) जर जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदेच्या एखाद्या कृतीमुळे किंवा ठरावामुळे भारताची सुरक्षितता धोक्यात येण्याचा संभव आहे [4](किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेस बाध येण्याचा संभव आहे) अशी राज्यपालाची खात्री झाली तर, त्याला अशी कृती किंवा ठरावशून्य किंवा निलंबित करता येईल आणि अशी कृती करण्यास किंवा चालू राहण्यास किंवा असा ठराव कार्यान्वित करण्यास प्रतिबंध करण्यासाठी (परिषद निलंबित करणे आणि परिषदेच्या ठायी निहित असतील किंवा तिला वापरता येण्यासारख्या असतील त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती स्वतःकडे घेणे यांसुद्धा) त्याला जरूर वाटतील अशा उपाययोजना करता येतील.

(२) या परिच्छेदाच्या पोटपरिच्छेद (१) अन्वये राज्यपालाने केलेला कोणताही आदेश, त्यामागील कारणांसह शक्य तितक्या लवकर राज्याच्या विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि तो आदेश राज्याच्या विधानमंडळाने प्रत्याहृत न केल्यास तो याप्रमाणे देण्यात आला त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीपर्यंत तो तसाच अंमलात राहील.

परंतु, राज्याच्या विधानमंडळाकडून अशा आदेशाचा अंमल चालू ठेवण्यास मान्यता देणारा ठराव पारित होईल तर व तेव्हा तेव्हा तो आदेश, राज्यपालाने प्रत्याहृत न केल्यास, या परिच्छेदान्वये एरव्हीही ज्या दिनांकास तो जारी असण्याचे बंद झाले असते, त्या दिनांकापासून पुढील बारा महिन्यांच्या कालावधीपर्यंत तो तसाच अंमलात राहील.

**१६. जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदेचे विसर्जन :—** [1](१) या अनुसूचीच्या परिच्छेद १४ अन्वये नियुक्त केलेल्या आयोगाच्या शिफारशीवरून

1. 'आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९ (१९६९' चा अधिनियम ५५)-कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे परिच्छेद १६ ला त्याचा पोट-परिच्छेद (१) म्हणून नवीन क्रमांक दिला व पोटपरिच्छेद (२) व (३) घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हापासून).

4. 'आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९ ' (१९६९ चा ५५)-कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हापासून).



राज्यपाल जाहीर अधिसूचनेद्वारे जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदेच्या विसर्जनाचा आदेश देऊ शकेल, आणि—

(क) परिषदेच्या पुनर्घटनेसाठी तत्काळ नव्याने सार्वत्रिक निवडणूक घेतली जावी असे निदेशित करू शकेल, किंवा

(ख) राज्याच्या विधानमंडळाच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने बारा महिन्याहून अधिक नाही इतक्या कालावधीकरता अशा परिषदेच्या हुकमतीखालील क्षेत्राचे प्रशासन स्वतःकडे घेऊ शकेल किंवा अशा क्षेत्राचे प्रशासन उक्त परिच्छेदान्वये नियुक्त केलेल्या आयोगाकडे किंवा त्याला सुयोग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही निकायाकडे सोपवू शकेल.

परंतु, जेव्हा या परिच्छेदाच्या खंड (क) अन्वये आदेश देण्यात आलेला असेल तेव्हा, नव्याने सार्वत्रिक निवडणूक होऊन परिषदेची पुनर्घटना होईपर्यंत राज्यपालाला संबंधित क्षेत्राच्या प्रशासनाविषयी या परिच्छेदाच्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेली कारवाई करता येईल.

परंतु, आणखी असे की, प्रकरणपरत्वे, जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदेला राज्याच्या विधानमंडळासमोर आपले विचार मांडण्याची संधी दिल्याशिवाय या परिच्छेदाच्या खंड (ख) खाली कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

[1][(२) जर कोणत्याही वेळी, स्वायत्त जिल्ह्याचे किंवा प्रदेशाचे प्रशासन या अनुसूचीच्या उपबंधानुसार चालवणे शक्य नाही अशी राज्यपालाची खात्री झाली तर, त्याला जाहीर अधिसूचनेद्वारे सहा महिन्याहून अधिक नाही इतक्या कालावधीकरता, जिल्हा परिषदेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रादेशिक परिषदेच्या ठायी निहित असलेले किंवा तिला वापरता येण्यासारखे असे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही कार्याधिकार किंवा शक्ती स्वतःकडे घेता येतील, आणि असे कार्याधिकार किंवा शक्ती तो या संबंधात विनिर्दिष्ट

1. 'आसाम पुनर्रचना (मेघालय) अधिनियम, १९६९' (१९६९ चा अधिनियम, ५५) कलम ७४ व चौथी अनुसूची याद्वारे परिच्छेद १६ ला त्याचा पोटपरिच्छेद (१) म्हणून नवीन क्रमांक दिला व पोट-परिच्छेद (२) व (३) घातले (२ एप्रिल, १९७० रोजी व तेव्हापासून).

करील अशा व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला वापरता येण्यासारख्या असतील असे घोषित करता येईल.

परंतु, प्रारंभिक आदेशाचे प्रवर्तन राज्यपालाला पुढील आदेशाद्वारे किंवा आदेशांद्वारे प्रत्येक प्रसंगी सहा महिन्याहून अधिक नाही इतक्या कालावधीने वाढवता येईल.

(३) या **परिच्छेदाच्या** पोट-परिच्छेद (२) अन्वये केलेला प्रत्येक आदेश, त्यामागील कारणांसह राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवला जाईल आणि आदेश निघाल्यानंतर राज्याच्या विधानमंडळाची जेव्हा प्रथम सभा भरेल त्या दिनांकापासून तीस दिवस संपताच तो जारी असण्याचे बंद होईल, मात्र तो कालावधी संपण्यापूर्वी राज्याच्या विधानमंडळाने त्याला मान्यता दिली असेल तर गोष्ट अलाहिदा.]

**१७. स्वायत्त जिल्ह्यामध्ये मतदारसंघ बनवतांना अशा जिल्ह्यातून, क्षेत्रे वगळणे :—**[2](आसामच्या किंवा मेघालयाच्या विधानसभेच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ, राज्यपालाला आदेशाद्वारे असे घोषित करता येईल की, [3](प्रकरण-परत्वे, आसाम किंवा मेघालय राज्यातील) स्वायत्त जिल्ह्यामधील एखादे क्षेत्र विधानसभेत राखून ठेवलेली किंवा ठेवलेल्या जागा भरण्यासाठी बनवलेल्या कोणत्याही मतदारसंघाचा भाग होणार नाही, पण आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे विधानसभेतील अशी राखून न ठेवलेली किंवा ठेवलेल्या जागा भरण्यासाठी बनवलेल्या मतदारसंघाचा भाग होईल.

[4]१८ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**१९. संक्रमणी उपबंध :—**(१) या संविधानाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, या अनुसूची अन्वये राज्यातील प्रत्येक स्वायत्त जिल्ह्याकरता जिल्हा परिषद घटित करण्यासाठी राज्यपाल कार्यवाही करील, आणि स्वायत्त जिल्ह्याकरता याप्रमाणे जिल्हा परिषद घटित होईपर्यंत, अशा जिल्ह्यासंबंधीचा

2. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८१)-कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे 'आसामची विधानसभा' याच्याऐवजी हा उल्लेख घातला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).
3. कित्ता-कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).
4. कित्ता-कलम ७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे परिच्छेद १८ गाळला (२१ जानेवारी १९७२ रोजी व तेव्हापासून).



प्रशासनाधिकार राज्यपालाच्या ठायी निहित असेल आणि अशा जिल्ह्यातील क्षेत्रांच्या प्रशासनास या अनुसूचीच्या पूर्वगामी उपबंधाऐवजी पुढील उपबंध लागू होतील, ते असे—

(क) संसदेच्या किंवा राज्याच्या विधानमंडळाचा कोणताही अधिनियम, राज्यपालाने जाहीर अधिसूचनेद्वारे तसे निदेशित केल्याशिवाय अशा कोणत्याही क्षेत्रास लागू होणार नाही, आणि कोणत्याही अधिनियमाबाबत असा निदेश देताना राज्यपाल असे निदेशित करू शकेल की, त्या क्षेत्रास किंवा त्याच्या कोणत्याही विनिर्दिष्ट भागास लागू होताना तो अधिनियम त्यास योग्य वाटतील अशा अपवादांसह किंवा आपरिवर्तनांसह परिणामक होईल ;

(ख) अशा कोणत्याही क्षेत्रात शांतता नांदावी आणि त्याचे शासन सुविहित व्हावे यासाठी राज्यपालाला विनियम करता येतील व याप्रमाणे केलेल्या कोणत्याही विनियमांद्वारे, अशा क्षेत्राला त्या त्या काळी लागू असेल असा संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा कोणताही अधिनियम किंवा असा कोणताही विद्यमान कायदा निरसित किंवा विशोधित करता येईल.

(२) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) चा खंड (क) याखाली राज्यपालाकडून दिला जाणारा कोणताही निदेश भूतलक्षी परिणामासह देता येईल.

(३) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) चा खंड (ख) याखाली केलेले सर्व विनियम तत्काळ राष्ट्रपतीला सादर करण्यात येतील आणि, तो त्यास अनुमती देईपर्यंत, ते परिणामक होणार नाहीत.

[1]**२०. जनजाती क्षेत्रे :—** (१) पुढील तक्त्यातील भाग १ ला, २ रा व ३ रा यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली क्षेत्रे ही अनुक्रमे आसाम राज्य, मेघालय राज्य व मिझोरम संघ राज्यक्षेत्र यांतील जनजाती क्षेत्रे होतील.

(२) पुढील तक्त्यातील कोणत्याही जिल्ह्यासंबंधीच्या निर्देशाचा अर्थ 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१'—कलम २—खंड (क) खाली नियत केलेल्या दिनांकाच्या निकटपूर्वी विद्यमान असलेल्या, त्या नावाच्या जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रासंबंधीचा निर्देश म्हणून लावला जाईल.

1. 'ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८१) कलम-७१ (झ) व आठवी अनुसूची याद्वारे परिच्छेद २० व २० क या ऐवजी घातले (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

परंतु, या अनुसूचीत परिच्छेद ३ पोट-परिच्छेद (१) खंड (ङ) व (च), परिच्छेद ४, परिच्छेद ५, परिच्छेद ६, परिच्छेद ८ चा पोट-परिच्छेद (२), पोट-परिच्छेद (३) खंड (क), (ख) व (घ) आणि पोट-परिच्छेद (४) आणि परिच्छेद १० पोट-परिच्छेद (२) खंड (घ) यांच्या प्रयोजनार्थ, शिलाँगच्या नगरपालिका क्षेत्रात समाविष्ट असलेल्या त्या त्या क्षेत्राचा कोणताही भाग [2] (खाशी-जैंतिया डोंगरी जिल्ह्यात) येत असल्याचे मानले जाणार नाही.

तक्ता

भाग १ ला

(१) उत्तर काचार डोंगरी जिल्हा

(२) मिकिर डोंगरी जिल्हा

भाग २ रा

[1](१) खाशी डोंगरी जिल्हा

(२) जैंतिया डोंगरी जिल्हा

(३) गारो डोंगरी जिल्हा

भाग ३ रा

[3]. . . . . . . . . . . . . . . . . . . . .

[4](१) चकमा जिल्हा

(२) लाखेर जिल्हा

(३) पावी जिल्हा

---

2. मेघालय शासन अधिसूचना क्रमांक डीसीए/३१/७२/११, दिनांक १४ जून १९७३ मेघालय राजपत्र, भाग सहा-क, दिनांक २३ जून १९७३, पृष्ठ २०० याद्वारे मूळ मजकूराएवजी घातले.

3. 'संघ राज्यक्षत्रांचे शासन (विशोधन) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८३) कलम १३ द्वारे 'मिझो जिल्हा' हे शब्द गाळले. (२९ एप्रिल, १९७२ रोजी व तेव्हापासून).

4. मिझोरम राजपत्र, १९७२ दिनांक ५ मे, १९७२, खंड एक, भाग दोन, पृष्ठ १७ यामध्ये प्रकाशित झालेला "मिझोरा जिल्हा परिषदा (संकीर्ण उपबंध) आदेश, १९७२" याद्वारे घातले (२० एप्रिल, १९७२ रोजी व तेव्हापासून).



[1][२०. क. **मिझो जिल्हा परिषदेचे विसर्जन** :—(१) या अनुसूचीमध्ये काहीही असले तरी, विहित दिनांकाच्या निकटपूर्वी अस्तित्वात असलेली मिझो जिल्ह्याची जिल्हा परिषद (यात यापुढे 'मिझो जिल्हा परिषद' म्हणून निर्देशिलेली) विसर्जित होईल व अस्तित्वात असण्याचे बंद होईल.

(२) मिझोरम या संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक एका किंवा अधिक आदेशाद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसाठी उपलब्ध करू शकेल, त्या अशा :—

(क) मिझो जिल्हा परिषदेची मत्ता, अधिकार व दायित्वे (तिने केलेल्या कोणत्याही कराराखालील अधिकार व दायित्वे यांसुद्धा) संघराज्याकडे किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे संपूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरित करणे ;

(ख) मिझो जिल्हा परिषद ज्यामध्ये पक्षकार असेल अशा कोणत्याही वैध कार्यवाहीमध्ये एक पक्षकार म्हणून मिझो जिल्हा परिषदेच्या जागी संघराज्य किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण आणणे, अथवा तिच्या जोडीला संघराज्य किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण सामील करणे ;

(ग) मिझो जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची संघराज्याकडे किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे बदली होणे अथवा त्या प्राधिकरणाने त्या कर्मचाऱ्यांना नव्याने पुन्हा सेवेत घेणे, अशा बदलीनंतर किंवा पुनःसेवायोजनानंतर अशा कर्मचाऱ्यांना लागू असतील अशा सेवेच्या अटी व शर्ती ;

(घ) मिझो जिल्हा परिषदेने केलेले आणि तिच्या विसर्जनाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही कायदे सक्षम विधानमंडळाकडून किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडून बदलण्यात, निरसित करण्यात किंवा विशोधित करण्यात येईपर्यंत, प्रशासक या बाबतीत करील अशा अनुकूलनांसह आणि आपरिवर्तनांसह—मग अशी अनुकूलने किंवा आपरिवर्तनें निरसन म्हणून केलेली असोत किंवा विशोधन म्हणून केलेली असोत—असे कायदे चालू ठेवणे ;

---

1. 'संघ राज्यक्षेत्रांचे शासन (विशोधन) अधिनियम, १९७१' (१९७१ चा ८३)-कलम १३ द्वारे मूळ परिच्छेद २० क एवजी २०क, २०ख व २०ग हे परिच्छेद घातले (२९ एप्रिल, १९७२ रोजी व तेव्हापासून).

(ङ) प्रशासकास आवश्यक वाटतील अशा आनुषंगिक, परिणामी व पूरकबाबी,

स्पष्टीकरण—या परिच्छेदामध्ये आणि या अनुसूचिच्या परिच्छेद २० ख मध्ये 'विहित दिनांक' या शब्दप्रयोगाचा अर्थ, 'संघ राज्यक्षेत्रांचे शासन अधिनियम, १९६३' याच्या उपबंधाखाली व त्यानुसार मिझोरम या संघ राज्यक्षेत्राची विधानसभा ज्या दिनांकी रीतसर घटित करण्यात आली तो दिनांक असा आहे.

**२०. ख. मिझोरम या संघ राज्यक्षेत्रातील स्वायत्त प्रदेश हे स्वायत्त जिल्हे असणे व त्याच्या अनुषंगाने करावयाचे असे संक्रमणी उपबंध :**—(१) या अनुसूचीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी —

(क) विहित दिनांकाच्या निकटपूर्वी मिझोरम या संघ राज्यक्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेला प्रत्येक स्वायत्त प्रदेश त्या दिनांकी व तेव्हापासून त्या संघ राज्यक्षेत्रातील एक स्वायत्त जिल्हा (यापुढे 'समनुरूप नवीन जिल्हा' म्हणून निर्देशिलेला) होईल व त्याचा प्रशासक एका किंवा अधिक आदेशांद्वारे, या खंडाचे उपबंध कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असतील अशी परिणामी विशोधन या अनुसूचीच्या परिच्छेद २० मध्ये (त्या परिच्छेदाला जोडलेल्या तक्त्याच्या ३–या भागासुद्धा) करण्यात यावीत असा निदेश देऊ शकेल आणि त्यानंतर उक्त परिच्छेद व उक्त ३ रा भाग हे तद्नुसार विशोधित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(ख) विहित दिनांकाच्या निकटपूर्वी अस्तित्वात असलेली, मिझोरम या संघ राज्यक्षेत्रातील स्वायत्त प्रदेशाची प्रत्येक प्रादेशिक परिषद ही (यापुढे 'विद्यमान प्रादेशिक परिषद' म्हणून निर्देशिलेली) त्या दिनांकी व तेव्हापासून आणि समनुरूप नवीन जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद रीतसर घटित करण्यात येईपर्यंत त्या जिल्ह्याची जिल्हा परिषद (यापुढे 'समनुरूप नवीन जिल्हा परिषद' म्हणून निर्देशिलेली) असल्याचे मानण्यात येईल.

(२) विद्यमान प्रादेशिक परिषदेचा प्रत्येक सदस्य हा—मग तो निवडून आलेला असो किंवा नामनिर्देशित केलेला असो-समनुरूप नवीन जिल्हा परिषदे



वर निवडून आलेला असल्याचे किंवा प्रकरणपरत्वे, नामनिर्देशित केलेला असल्याचे मानण्यात येईल आणि तो या अनुसूचीखाली समनुरूप नवीन जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद रीतसर घटित करण्यात येईपर्यंत पद धारण करील.

(३) समनुरूप नवीन जिल्हा परिषदेकडून परिच्छेद २ चा पोट-परिच्छेद (७) व परिच्छेद ४ चा पोट-परिच्छेद (४) याखाली नियम करण्यात येईपर्यंत, विद्यमान प्रादेशिक परिषदेने उक्त उपबंधाखाली केलेले व विहित दिनांकाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले नियम मिझोरम संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक त्यामध्ये करील अशा अनुकूलनांसह व आपरिवर्तनांसह समनुरूप नवीन जिल्हा परिषदेच्या संबंधात परिणामक होतील.

(४) मिझोरम या संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक एका किंवा अधिक आदेशाद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करू शकेल :—

(क) विद्यमान प्रादेशिक परिषदेची मत्ता, अधिकार आणि दायित्वे (तिने केलेल्या कोणत्याही संविदेखालील अधिकार व दायित्वे यासुद्धा) समनुरूप नवीन जिल्हा परिषदेकडे संपूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरित करणे ;

(ख) विद्यमान प्रादेशिक परिषद ज्यामध्ये पक्षकार असेल अशा वैध कार्यवाहीमध्ये एक पक्षकार म्हणून विद्यमान प्रादेशिक परिषदेच्या जागी समनुरूप नवीन जिल्हा परिषद आणणे ;

(ग) विद्यमान प्रादेशिक परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची समनुरूप नवीन जिल्हा परिषदेकडे बदली होणे किंवा तिने त्या कर्मचाऱ्यांना नव्याने पुन्हा सेवेत घेणे, अशा बदलीनंतर किंवा पुनःसेवा योजनानंतर अशा कर्मचाऱ्यांना लागू असतील अशा सेवेच्या अटी व शर्ती ;

(घ) विद्यमान प्रादेशिक परिषदेने केलेले व विहित दिनांकाच्या निकट पूर्वी अंमलात असलेले कोणतेही कायदे सक्षम विधानमंडळाकडून किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडून बदलण्यात, निरसित करण्यात किंवा विशोधित करण्यात येईपर्यंत, प्रशासक याबाबतीत करील अशा अनुकूलनांसह आणि आपरिवर्तनांसह—मग अशी अनुकूलने किंवा आपरिवर्तने निरसन म्हणून केलेली असोत किंवा विशोधन म्हणून केलेली असोत असे कायदे चालावेत ;

(ङ) प्रशासकास आवश्यक वाटतील अशा आनुषंगिक, परिणामी व बाबी.

**२० ग. निर्वचन :**––यासंबंधात केलेल्या कोणत्याही उपबंधाच्या अधीनतेने या उपबंध मिझोरम या संघ राज्यक्षेत्रास लागू होताना, अशा प्रकारे परिणामक होतील की,

(१) जणू काही राज्यपाल व राज्याचे शासन यासंबंधीचे निदेश म्हणजे अनुच्छेद २३९ खाली नियुक्त केलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकांचे निर्देश असावेत, राज्यासंबंधीचे निर्देश "राज्याचे शासन" या शब्दप्रयोगातील उल्लेख खेरीजकरून) म्हणजे मिझोरम या संघ राज्यक्षेत्राच्या विधानसभेसंबंधीचे निर्देश असावेत आणि राज्य विधानमंडळासंबंधीचे निर्देश म्हणजे मिझोरम या संघ राज्यक्षेत्राच्या विधानसभेसंबंधीचे निर्देश असावेत.

(२) जणू काही––

(क) परिच्छेद ४ च्या पोट-परिच्छेद (५) मध्ये संबंधित राज्याच्या शासनाचा विचार घेण्याबाबतचा उपबंध गाळलेला असावा.

(ख) परिच्छेद ६ च्या पोट-परिच्छेद (२) मध्ये, "राज्याच्या शासन शक्तीच्या व्याप्तीत येत असेल अशी" या मजकुरा-ऐवजी "मिझोरम या संघ राज्यक्षेत्राच्या विधानसभेस जिच्या संबंधात कायदे करण्याची शक्ती असेल अशी" हा मजकूर दाखल करण्यात आलेला असावा ;

(ग) परिच्छेद १३ मध्ये अनुच्छेद २०२ खाली हा मजकूर गाळण्यात आलेला असावा.

**२१. अनुसूचीचे विशोधन:**––(१) संसदेला या अनुचीसूत असलेल्यां-पैकी कोणताही उपबंध कायद्याद्वारे वेळोवेळी त्यात भर घालून, बदल करून किंवा निरसन करून त्याद्वारे विशोधित करता येईल आणि, जेव्हा ही अनुसूची याप्रमाणे विशोधित होईल तेव्हा, या अनुसूचीसंबंधी या संविधानात असलेल्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ याप्रमाणे विशोधित झालेल्या अशा अनुसूचीसंबंधीचा निर्देश म्हणून लावला जाईल.

(२) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) मध्ये उल्लेखिलेला असा कोणताही कायदा हा, अनुच्छेद ३६८ च्या प्रयोजनार्थ या संविधानाचे विशोधन असल्याचे मानले जाणार नाही.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ६.